म. ग्रं. सं. ठाणें

विषय

लेखक काशीनाथ शिवराम

२५२

सन १८८२

ग्रंथालय क्रमांक

पुस्तकाचें नांव हिंदुस्थानांतील शेतकऱ्यांची स्थिती व शेतकीची कामे

२६

हिंदुस्थानांतील शेतकऱ्यांची स्थिती व शेतकीची कामे.

निबंध

# हिंदुस्थानांतील शेतकऱ्यांची स्थिति व शेतकीचें कामें.

म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. नं. ९८०
सन १८८२

त्र्यंबक खरे

याणीं तयार केलें.

---

तें

ज्ञानप्रकाश छापखान्यांत छापिलें.

पुणें.

---

१८८२.

सन १८६७ च्या २५ व्या आक्टा प्रमाणें रजिस्टर केलें आहे.

किंमत ८ आणे.

A. L. Khambete

# हिंदुस्थानांतील शेतकऱ्यांची स्थिति व शेतकीचीं कामें.

हें

पुस्तक

**काशिनाथ त्रिंबक खरे**

याणीं तयार केलें.

---

तें

ज्ञानप्रकाश छापखान्यांत छापिलें.

**पुणें.**

---

१८८२.

सन १८६७ च्या २५ व्या आक्टा प्रमाणें रजिस्टर केलें आहे.

किंमत ८ ८ आणे.

# प्रस्तावना.

आमच्या देशांत जमीन पुष्कळ व हवापाणी पिकाच्या सोयीचें असल्यामुळें शेतकीचें काम फार चालतें. आमच्या देशांतील एकंदर २५ कोटी प्रजेपैकीं १६ कोटींपेक्षांही ज्यास्त माणसें शेतकऱ्यांचीं आहेत. आलीकडे कलाकौशल्यांचीं कामें फारच डबघाईस आल्यामुळें तिकडचा आश्रय कमी झाला, ह्मणून आतां मोठा आधार काय तो शेतकीचा राहिला आहे. अशा मोठ्या संख्येच्या शेतकऱ्यांची स्थिति जशी बरीवाईट असणार त्या कलावर सगळ्या देशाची स्थिति झुकावयाची हा नियम आहे. त्या अनुरोधानें पाहिलें तर आज आमच्या देशावर इतकें दैन्य व दौर्बल्य यावें हें सहाजिक आहे; कारण सगळ्या देशाचे आधारस्तंभ जे शेतकरी त्यांचीच स्थिति जर शोचनीय झाली आहे तर तदाश्रयानें राहणाऱ्या इतर लोकांची स्थिति तरी कोठून चांगली राहणार? अशा स्थितींत सगळा देशाचा देश दरिद्री व दुर्बल व्हावा, ह्या नियमाप्रमाणेंच आज आमच्या देशाची स्थिति झाली आहे.

आमच्या देशावर आलेलें हें महत्संकट दूर करण्यास झटावें, हा आमच्या प्रत्येक मनुष्याचा धर्म आहे. त्याप्रमाणें करण्याजोगा खरा उपाय म्हटला म्हणजे आमच्या शेतकऱ्यांची स्थिति सुधारून त्यांस शहाणें करणें हाच होय. ह्या समजुतीनें हा प्रयत्न आरंभला आहे. आज विद्येच्या दृष्टीनें पाहिलें तर शेतकरी लोक मुळाक्षरांच्याही

मागें आहेत. ते अशा स्थितींत असतां आमच्या इच्छित हेतूंच्या कामांत त्यांस बोलके करण्यास त्यांजवळ त्यांच्या नित्य सहवासाच्या गोष्टीच बोलल्या पाहिजेत; कारण अन्य गोष्टींत त्यांचें तोंड शिरकणार नाहीं. शेतांतील अनेक कामांच्या अथवा संसारांतील निरनिराळ्या स्थितीच्या गोष्टी जर त्यांजपुढें वाचल्या तर कोणत्याही शेतकऱ्यास किंवा त्याच्या बायकामुलांस त्यांतला भावार्थ कळण्यास उशीर लागणार नाहीं, आणि त्यांत जर कांहीं आधिक उणें आढळलें तर ते लागलीच शंका घेऊन विचारतील, अशा प्रकारें तरी ते बोलूं लागतील. ज्या शेतकऱ्यांच्या मुलांस थोडेंबहुत वाचतां येत असेल त्यांस असल्या गोष्टी वाचण्याची हौस वाटून त्यांनीं मोठ्या प्रेमानें आपल्या किंवा शेजारच्या घरीं या पुस्तकांतल्या गोष्टी वाचून श्रोत्यांचीं मनें ह्या विषयाकडे वळवावीं. ह्या युक्तीनें आम्हीं धरलेला हेतु कांहीं तरी साधेल अशा समजुतीवर हा अल्प प्रयत्न केला आहे.

ह्या पुस्तकांत शेतकऱ्यांच्या स्थितीच्या व तिच्या सुधारणेच्या संबंधाच्या कांहीं गोष्टी, व शेतकीच्या व गुराढोरांच्या कामाचे कांहीं निबंध लिहिले आहेत. ते एकाच प्रकारचे सलग घातल्यानें वाचणारांस कंटाळा येईल, तो न यावा म्हणून चाळून पाळून दोन्ही प्रकार एका मागें एक योजले आहेत. हें पुस्तक वाचणाऱ्यांस आमच्या देशांतल्या शेतकऱ्यांची खरी स्थिति कळावी, व तिची सुधारणा करण्याची त्यांच्या मनास आंच लागावी हा एक हेतु आहे. त्याचप्रमाणें आपली स्थिति किती वाईट झाली आहे व ती सुधारण्याकरितां आपण कोणकोणत्या

सं.गो.८२



गोष्टी केल्या पाहिजेत, हें शेतकऱ्यांचे वायकापोरांसुद्धां सर्वांचे मनांत चांगलें भरावें; आणि शेताच्या जमिनीची, तिच्या मरामतीची, पेरणीपासून मळणीपर्यंत शेताची, व गुराढोरांदिकांचीही थोडीबहुत माहिती लेखनद्वारा त्यांस ऐकण्यास सांपडावी हा आमचा दुसरा हेतु आहे. तो साधतांना खेडेगांवच्या शेतकऱ्यांस कळण्याचे कामीं हा लेख कितपत सुबोध झाला आहे हें ठरविणें वाचणारांकडे आहे.

ह्या लेखाचा खेडेगांवच्या शेतकऱ्यांत पुष्कळ प्रसार होऊन त्यांस अल्पस्वल्प उपयोग होऊं लागल्यास अशा प्रकारची थोडी तरी सेवा करण्याची उमेद येईल, आणि परमेश्वर कृपेनें तसा योग जमून आल्यास आम्हास कृतार्थ झाल्यासारखें वाटेल.

# अनुक्रमणिका.

| | |
|---|---|
| आमचे शेतकरी | |
| खेडेगांवची रचना | ४ |
| आमच्या शेतकऱ्यांविषयीं लोकांची समजूत व वर्तन. | १० |
| शेतकऱ्यांची जमीन | १४ |
| शेतकऱ्यांची स्थिति सुधारण्याचे उपाय | १७ |
| शेत जमीन तयार करणें | २० |
| शेतकऱ्यांची स्थिति सुधारण्यास शिक्षणाची अवश्यकता. | २४ |
| पेरणी करणें व कोळपणें | २७ |
| शेतकऱ्यांची खरी ठेव | ३० |
| शेताची राखण व रक्षणाचे अन्य उपाय | ३२ |
| शेतकऱ्यांची करमणूक | ३४ |
| शेताची कापणी व मळणी | ३९ |
| शेतकऱ्यांच्या शाळा | ४१ |
| गुरेंढोरें | ४५ |
| सरकार आणि रयत | ४९ |
| गुराखी | ५० |
| खेडेगांवांतील आपसांतले तंटे | ५३ |
| खेडेगांवचे अधिकारी व सावकार यांस प्रार्थना | ५६ |
| खेडेगांवच्या शेतकऱ्यांस सूचना | ६१ |
| सर्व लोकांस विनंती | ६७ |

# हिंदुस्थानांतील शेतकऱ्यांची स्थिति व शेतकीचीं कामें.

## आमचे शेतकरी.

आमच्या देशांत पुष्कळ लोक राहातात, व ते अनेक प्रकारचे धंदे करतात. त्यांचा देशास उपयोग होतो, तथापि सर्वांपेक्षां आमच्या देशास शेतकऱ्यांचा उपयोग ज्यास्त आहे. शेतकामाचीं नांगर, कुळव, पाभार, इत्यादि विखणें असतात, तीं ओढण्यास गुरांढोरांची फार गरज लागते. शहाणे शेतकरी म्हणतात कीं, 'आमची पुंजी काय ती हीं जमीन व ढोरें. ही भूमाता अवघ्या जगाचा भार सोसते. त्याचप्रमाणें ह्या मुक्या जनावरांनीं शेतकाम ओढण्याचा मक्ता घेतला आहे. रागाच्या तावांत आम्हीं त्यांना पुष्कळ झोडपतों तरी बिचारीं कष्ट करतात, म्हणूनच आमच्या पोटास मिळतें' हें बोलणें अगदीं खरें आहे.

शेतकाम ढोरांवांचून होत नाहीं. तसें आमच्या देशाचें पोट शेतकऱ्यांवांचून आज भरत नाहीं. शेतकरी बिचारे अडाणी व दरिद्री खरे, तरी त्यांच्या कष्टावर सारी दुनया पोसत आहे. ते कष्ट करतात म्हणून सर्वांस खाण्यास मिळतें. शहरच्या लोकांस शेतकऱ्यांची स्थिति कळत नाहीं, पण खेडेगांवांत गेलें म्हणजे त्यांची खरी स्थिति डोळ्यांनीं दिसते. त्या गरीबांचीं घरें इतकीं लहान व

ठेंगणीं असतात कीं, घरांतल्या मडक्यांच्या उतरंडी व इतर अडगळ राहून खुली जागा फारच थोडी राहते. बाप्या माणूस आंत उभा राहिल्यास छपराचे वांसे त्याच्या डोक्यास लागतात. घरावर पाहिलें तर गवती छपर किंवा भिकार खपरेल. यामुळें पाऊस पडला कीं, घरांत ओल येतें, व पाणीही शिरतें. ही घरांतली स्थिति. बाहेर तरी काय असेंच. दिवसभर काबाड कष्टामुळें आंगावाटे घामाच्या धारा चालल्या असतात. दुपारचें ऊन जिकडे तिकडे मी म्हणत असतें; जमीन खरपुस तापून सर्वत्र रखरख पसरली असते, अशा ऐन उन्हाच्या वेळीं नागरणी करावी लागते. पावसाळ्यांत संततधार चालली असतां सारा दिवस चिखलापाण्यांत राहून लावणीची घात साधावी लागते. हिंवाळ्यामध्यें ऐन थंडीच्या कडाक्यांत जिकडेतिकडे गारठ्यामुळें बाहेर तोंड काढवत नसतें, अशा वेळीं एका पटकुरावर सगळी रात्र जागून रानांत शेताची राखण करावी लागते, किंवा जित्रबास पाणी देण्यासाठीं वाफ्यांचीं दारीं मोडावीं लागतात. त्यांचे हे श्रम पाहिले म्हणजे आंगावर खरोखर कांटा उभा राहतो. असले श्रम करणाऱ्या बिचाऱ्यांचें खाणें पाहिलें तर नाचण्याची अथवा जोरीबाजरीची नुसती भाकर. तोंडी लावण्यास नशिबानें मिळाली तर मिर्च्यांची चटणी, कांदा, नाहीं तर मिठाचा खडा. तोही महाग !! उभ्या वर्षांत कित्येकांची भाताशीं गांठच पडत नाहीं. कधीं कधीं तर भाकर देखील मिळेनाशी होते. मग नुसतीं रताळीं तर रताळींच, गाजरें तर गाजरेंच, उकडून खावीं. किंवा ज्या वेळेस जी वरव सांपडेल तिजवरच पोटाची भर

करून कसेबसे दिवस लोटावे !! देवा! आमच्या शेतकऱ्यांची काय स्थिति ही!!!

अशा रीतीनें बाराही महिने दैन्य भोगून मोठ्या कष्टानें शेत पिकवितात, पण शेवटीं त्यांस त्यांतलें कांहीं उरत नाहीं. दाणा पदरीं पडण्या पूर्वींच सरकारी धाऱ्याची वेळ येते, त्यामुळें पट्टी भरण्याची मुष्कील पडते. शेतकऱ्यांस पट्टीचा धाक फार वाटतो, कारण जरा मुदत टळली कीं, आलीच शेतावर जप्ती. हजार अडचणींनीं एकदां पट्टीचा हप्ता भरावा, तों सावकार लोकांच्या झुंडीच्या झुंडी खळ्यावर येऊन धडकतात. त्यांत साऱ्या पिकाचा फडशा उडतो. बारा महिने उपासमार करून व जिवापाड कष्टांत राबून पीक उभें केलें, पण त्याची अशी वाट लागली; हें पाहून त्या बिचाऱ्यांस काय वाटत असेल? घसा दाटून त्यांच्या डोळ्यांवाटे दुःखाश्रु गळत नसतील काय? पोटांत भडभडून त्यांचें काळीज करपत नसेल काय? आमच्या देशांत अशा दैन्य स्थितीस एक दोन किंवा दहा पांच शेतकरी येऊन पोंचले आहेत असें नाहीं, तर बहुतेकांची स्थिति वाईट आहेच. पण दर साल हजारों शेतकरी असल्या अत्यंत दैन्य दशेंत येऊन पडत आहेत! दयानिधे देवा, ह्या बिच्याऱ्यांची तुला करुणाच येत नाहीं का? किंवा अद्याप त्यांचें दुर्दैवच संपलें नाहीं? कसेंही असो. आतां त्यांचा तूं अंत पाहूं नको. जिकडून त्यांचे पांग फिटतील असा कांहीं तरी मार्ग त्यांस कृपा करून दाखीव. एवढेंच तुला आम्हा दीनांचें हात जोडून मागणें आहे.

# खेडेगांवची रचना.

आमच्या देशांत एकंदर लोकवस्तीमध्यें मोठालीं शहरें व कसब्याचे गांव थोडे, फार भरणा लहान गांवांचाच असतो. त्यांस खेडेगांव म्हणतात. सर्व खेडेगांवांची रचना व व्यवस्था बहुत करून सारखी असते. त्यांत कांहीं गांव मोठे, कांहीं मध्यम, व कांहीं फार लहान असे असतात. मोठ्या गांवाखालीं जमीन फार असून त्यांत लोकवस्ती पुष्कळ असते, गांवचे मुख्य व इतर पुष्कळ लोक राहतात त्या स्थळास गांवठाण किंवा गांव म्हणतात, गांवापासून दूर पण गांवसीमेच्या आंत आजूबाजूस थोडथोडीं घरें बांधून शेतकरी लोक राहतात त्या स्थळास वाडी म्हणतात. कित्येक मोठाल्या गांवाखालीं दहा दहा बारा बारा देखील वाड्या असतात. मध्यम गांवाखालीं जमीन कमी, वाड्या थोड्या, व लोकवस्ती माफक असते, आणि लहान गांवाखालीं जमीन थोडकी, वस्ती कमी, व वाडी मुळींच नसते.

अशा गांवांत वंशपरंपरेचा मुख्य अधिकारी असतो त्यास मोकदम किंवा पाटील म्हणतात. जमिनीच्या संबंधाचें सर्व काम व वसूल करतो त्यास मुलकीचा किंवा काळीचा पाटील म्हणतात, व गांवचे लहान सहान तंटे व चोऱ्या इत्यादि फौजदारी कामाची देखरेख करतो त्यास पोलीस पाटील म्हणतात. कित्येक गांवीं हीं दोन्हीं कामें एकाकडेच असतात, व कांहीं गांवीं दोन कामास वेगळाले दोन मनुष्य नेमतात. पाटलास वरिष्ठ अधिकारी तालुक्याचा मामलेदार असतो, म्हणून गांवकीच्या कामाचे सर्व हिशेब व रिपोर्ट मामलेदाराकडेसच गुजरावे लागतात.

गांवकीच्या कामाबद्दल गांवांत पाटलास इनाम जमीन असते तिला पाटील--पासोडी म्हणतात. त्या खेरीज कांहीं नक्त नेमणूकही दरसाल सरकारांतून मिळते. पाटलाचे हाताखालीं दिवाणासारखें कारकुनीचें काम करणारा असतो त्या मनुष्यास कुळकर्णी म्हणतात. त्याला मुशाहिऱ्याबद्दल दरसाल सरकारांतून रोख पैसा मिळतो, व क्वचित गांवीं इनाम जमीनही असते. गांवच्या जमिनीचा झाडा व पैशाचा हिशेब ठेवून इतर सर्व प्रकारचें लिहिण्याचें काम पाटलाच्या हुकमाप्रमाणें कुळकर्ण्यास करावें लागतें. म्हणून गांवचें दप्तर त्याजवळ राहातें. पाटील फक्त सहीचा किंवा निशाणीचा मात्र धनी असतो. पाटील व कुळकर्णी हे आपल्या गांवच्या रयतेचे व सरकारचेही वतनी कामगार असल्यामुळें गांवांत त्यांचा मोठा मान असतो.

पाटलाचे हाताखालीं गांवकीचीं व रयतेचीं इतर कामें करण्यास कांहीं माणसें असतात त्यांस बलुतीं म्हणतात. त्यांचीं नांवें व कामागिरीः——

१ **जोशी**——पंचांग सांगून सर्व धर्मकृत्यें चालविणारा.

२ **चौगुला**–गांवचा कामाठी. दप्तर वागविणारा.

३ **गुरव**——ग्राम देवतांची पूजा करणारा, पत्रावळी देणारा, व बेगारी.

४ **सुतार**——शेतकी संबंधी नांगर वगैरे लांकडी साहित्य तयार करणारा.

५ **लोहार**——शेतकीचीं लोखंडी हत्यारें वगैरे घडून देणारा.

६ **सोनार**——(पोतदार) धाऱ्याचें रुपये पारखून घेणारा.

७ **कोळी**—पाणी देणारा व चावडी सारविणारा.

८ **कुंभार**—मातीचीं भांडीं वगैरे पुरविणारा.

९ **न्हावी**—हजामती करणारा व बेगार वाहाणारा.

१० **परीट**—वस्त्रें धुणारा.

* { ११ **माळी**—फुलें देणारा व भाजीपाला पोंचविणारा.

१२ **तांबोळी**—विड्याचीं पानें देणारा.

१३ **मुलाणा**—बकरीं कापणारा. }

१४ **रामोशी**—गांवची रखवाली करणारा.

१५ **चांभार**—कातड्याचें सामान पुरविणारा.

१६ **माहार**—( तराळ ) शिपायाचें काम करणारा व मेलेलीं जनावरें नेणारा.

१७ **मांग**—दोऱ्या व नाडे वगैरे पुरविणारा.

ह्या बलुत्यांपैकीं माहारास मात्र गांवांत इनाम जमीन असते. तिला माहारकी, हडकी, व हडवळा अशीं नांवें असतात. माहार लोकांस गांवचें काम नेहेमी फार पडतें. पाटलाचे दाराशीं किंवा चावडीवर त्यास रात्रंदिवस हजर असावें लागतें. पाटील कुळकर्णी सांगतील त्यास बोलावून आणणें, वसूल वासलातीच्या किंवा इतर कामाच्या गांवच्या रयतेस ताकिदी देणें, गावकी संबंधीं कागदपत्र एखाद्या गांवास किंवा तालुक्यास पोंचविणें, वसुलाचें पोतें सरकारांत नेऊन पोंचविणें, इत्यादि अनेक कामें माहार लोकांस करावीं लागतात. पाळीप्रमाणें जो माहार गांवकीचें काम करतो त्यास हुद्याचे नात्यानें ‘ एसकर ’ असें ह्मणतात. तो दररोज घरोघर

* हे तीन इसम सर्व गावांस नसतात. व असतात तेथें ह्यांस बलुतें मिळण्याचा इतरांपेक्षां हक्क कमी असतो.

फिरला असतां त्याला भाकर मिळते. महार लोकांस आपल्या पांढरीचा मोठा अभिमान असतो. गांवावर कसलीही हवक आली तरी तीस डोकें द्यायला महार पुढें होतो. गांवच्या सीमेची व गांवांतल्या रयत लोकांच्या जमिनीच्या हद्दीची महार लोकांस फार माहिती असते. कित्येक ठिकाणीं शेंकडो वर्षे कुजत पडलेले जमिनीचे तंटे माहितगार व वृद्ध अशा माहार लोकांच्या साक्षीवरून उलगडले आहेत. माहार लोक कितीही विपत्तींत पडले किंवा दुष्काळासारखे अथवा राज्यक्रांती सारिखे जरी गांवांवर प्रसंग गुदरले तरी ते बहुधा गांव सोडून परागंदा होत नाहींत. त्यांच्या प्रामाणिकपणाची व एकनिष्ठेची सर्वत्र प्रसिद्धि आहे. नेहेमी हालअपेष्टेंत दिवस काढणाऱ्या गांवच्या गरीब माहाराजवळ वसुलाचे हजारों रुपये देऊन तालुक्यास भरण्याकारितां पाठवितात, तरी दुर्वासना धरून कधींही लबाडी करीत नाहींत ही गोष्ट त्यांस मोठया भूषणाची आहे. ह्याला सर्वांबराबर बलुतें मिळतें.

इतर बलुतदार लोकांस कामगिरी थोडी पडतें. त्यांस सरकारांतून नेमणूक किंवा गांवांत इनाम जमीन नसते. फक्त सराइच्या दिवसांत गांवांत धान्याचीं खळीं सुरू झालीं म्हणजे ते खळ्यावर जातात तेव्हां शेतकरी आपल्या शेताच्या व पिकाच्या मगदुराप्रमाणें त्यांस थोडेंबहुत धान्य व पेंढीकाडी देतो. त्यास भिकणें म्हणतात, तरी हें मिळण्याचा हक्क आहे. बागाईती गांवांत बाराही महिने अनेक प्रकारचे उदीम होतात, त्या त्या वेळेस बलुतदार शेतावर गेला असतां असेल त्या पदार्थांपैकीं थोडाबहुत अंश मिळतो. अशा रीतीनें ह्या बलुतदार लोकांचा गांवांत गुजारा चालतो.

गांवांतील लोकांचीं घरें जवळ जवळ असतात, पण रामोशी, चांभार, माहार, व मांग ह्यांचीं घरें गांवाच्या बाहेर असतात. गांवची चावडी बहुतकरून गांवच्या मध्यभागीं असते, ती पाटलाची व गांवच्या सर्व लोकांची कचेरीची जागा मानतात.

ह्या गांवरचेनकडे पाहून नीट विचार केला असतां मूळ वसाहत करणाऱ्या लोकांचें मोठें शहाणपण दिसून येतें. टिकाऊ व मजबूद इमारती खोलपायापासून बळकट द्रव्यांनीं भरून काढतात, म्हणून त्या दरसाल दुरुस्ती होणाऱ्या बंगल्यांप्रमाणें अल्पायुषी होत नाहींत. आमच्याकडील कित्येक इमारती शेंकडो वर्षें सगळ्या ऋतूंशीं टकरा मारीत असून तीळभर न डगतां आणखी अनेक शेंकडे जगतील अशी इभ्रत दाखवीत आहेत. त्याप्रमाणें ह्या खेडेगांवच्या वसाहतीचे मूळ पाये खोल व बळकट द्रव्यांनीं भरीत आणून, मग त्याजवर ह्या वसाहतीच्या शाश्वत इमारती बांधल्या आहेत असें दिसतें. या रचनेंत गांवच्या लोकांस लागणाऱ्या सर्व सोयी फार व्यवस्थेनें करून ठेवल्या आहेत. ज्याचे हातीं सगळ्या गांवची सत्ता ठेविली आहे त्यास स्थाईक नेमणूक पोंचावी ह्मणून इनाम जमीनच दिली आहे. त्याप्रमाणें नेहेमी फार काम पडणाऱ्या मनुष्याची नेमणूक इनाम जमिनीनें देऊन ठेविली आहे. ह्या निरंतर वंशपरंपरेच्या नेमणुकीमुळें पाटील व माहार हे गांवचे मुख्य दोन खांब होऊन बसले आहेत. ते कदापि हालावयाचे नाहींत. मग पडण्याचें भय कुठलें? त्याप्रमाणेंच बरकड लोकांची हक्कदारीच्या संबंधानें बेतावाताची स्थाईक सोय करून ठेविली आहे. यामुळें देशावर

अनेक प्रकारचीं बहुत वेळ संकटें आलीं तरीही गांव-वसाहतीची मोठ्या चातुर्यानें जडलेली कडी उकलत नाहीं. माजी अमलांत देशमुख, देशपांडे इत्यादि देशाधिकारी लोकांचें फार महात्म असे. परंतु दुर्दैवानें तें सध्यां नष्ट झालें आहे. तथापि ग्रामाधिकारी कायम आहेत हीं संतोषाची गोष्ट होय. ह्या रचनेंत मुख्य बीज हें आहे कीं, नेहमीं जरूर लागणाऱ्या कामगारांस दिलेले हक्क पिकाच्या परिणामावर ठेवले आहेत म्हणून शेतकामास मदत करण्यास अंशत: सगळेच हक्कदार लोक झटतात. यामुळें परस्परांच्या अडचणी दूर होऊन एकमेकांशीं गोडीगुलाबीनें वागावेंच लागतें. कारणपरत्वें एकमेकांची झगडाझगडी झाली तरी ती लवकर मिटली जाते.

पाटील हा गांवचा मुख्य अधिकारी असल्यामुळें लोकांवर त्याचें मोठें वजन असतें. त्याचें म्हणणें सर्व लोक मानतात. सहसा कोणीं मोडीत नाहीं. असल्या गांवांतले पाटील लोक जर शहाणे झाले, किंवा त्यांस शहाणे करण्याचा कोणीं प्रयत्न केला, तर एकदम हजारों गांवचे लोक शहाणे केल्याचें फळ येणार आहे. अज्ञानाच्या योगानें किती हानि होते, व ज्ञानाच्या सहाय्यानें किती कल्याण होण्याचा संभव आहे, हें नीटपणें पाटील लोकांचे मनांत भरवून दिल्यास तेही शहाणे होऊन ज्ञानप्रसारार्थ मनोभावें झटतील. त्यांच्या अल्प स्वल्प प्रयत्नानें खेडेगांवांत जें फळ येणार आहे, तितकें फळ येण्याकरितां लाखों रूपये खर्चून-मोठाल्या अधिकाऱ्यांनीं दीर्घ प्रयत्न केले तरी येण्याचा भरंवसा नाहीं. म्हणून पाटीललोक शहाणे करण्याचा आधीं प्रयत्न करावा, हें फार इष्ट आहे.

खेडेगांवची जमीन वाहणारे लोक मिरासी वतनदार अशी प्राचीन चाल होती. यामुळें एखादें कूळ परागंदा होऊन दहा वीस वर्षें जरी गेलें, तरी त्याची गतकुळी जमीन दुसरे कोणास मिरासी हक्कानें देत नसत. यामुळें आपल्या गांवीं आपलें मिरासी शेत आहे, अशी कुळास आशा राहून त्याचा परत गांवांत येण्याकडे ओढा राही. प्रस्तुत ही चाल मोडून गेली आहे खरी, परंतु सगळेच लोक उपरी होण्याचा ह्या स्थितींत दोष आहे. म्हणून ही चाल आमच्या प्राचीन रीतीस प्रशस्त दिसत नाहीं.

## आमच्या शेतकऱ्यांविषयीं लोकांची समजूत व वर्तन.

आमचे शेतकरी कसे असतात हें वर सांगितलें. आतां देशांतले इतर लोक त्यांच्याशीं कसे वागतात, व यांच्याविषयीं त्यांची काय समजूत आहे तें पाहूं. आमच्या देशांत २५ कोटी लोक राहतात, त्यांपैकीं फक्त शेतकऱ्यांची संख्या सुमारें १६ कोटी होईल. हे लोक रात्रंदिवस बायका पोरांनिशीं राबून जमीन पिकवितात, म्हणून बाकीच्यांस खायला मिळतें, हें उन्हातान्हांत नेहमीं खपून सगळ्यांच्या पोटास घालतात, पण त्या विचाऱ्यांची कींव कोणास तरी येते का? नाहीं. जर कांहीं येती तर त्यांचें अज्ञान व दारिद्र्य यत्किंचित तरी उणें झालें असतें, परंतु तसें न होतां तें अधिकच वाढत चाललें आहे. तेव्हां यास काय म्हणावें? पहा गांवचे पाटील कुळकर्णी, बलुतदार, सावकार, मारवाडी, व सरकार, हे सर्वच ह्यांच्या

अंगाचे एकसारखे लोचके तोंडीत असतात. ‘कुणबी का बेटा, जबजब कूठा तबतब मीठा.’ ह्या म्हणण्याप्रमाणेंच बहुधा सर्वांची समजूत झाल्यामुळें, बिचाऱ्यांचे [illegible] पिळून काढीत आहेत. निकस जमीन झाली असतां तिला चांगलें खत घालून शहाणे शेतकरी दरसाल पीक घेतात. त्याप्रमाणें जरी ह्या कुणब्यांविषयीं लोकांची वर्तणूक असती तर इतकें वाईट वाटलें नसतें, परंतु कुणब्यांचें बुचाटून घ्यायचें सर्वस्व, आणि त्यांस परत द्यायचें भोपळ्या येवढें + + म्हणून फार खेद वाटतो. इतकेंच नाहीं, तर हाच क्रम कांहीं दिवस सतत चालल्यास कुणबी लोक अगदीं नि:सत्व होऊन पडतील. मग त्यांचा तर सर्वस्वी नाशच, पण इतर आठ नऊ कोट खाबू लोक पोसले जात आहेत त्यांचाही फडशा नाहीं का उडणार? ह्या भयंकर भावी स्थितीचें ‘शेतकऱ्यांस ऋणमुक्त करणारा कायदा रूप’ प्रस्थान येऊन धडकलें आहे. तरी लोक अजून उमजत नाहींत. ह्यास काय म्हणावें? शहाणपण कीं शुद्ध स्वार्थ, हें कळत नाहीं.

मनुष्याचा स्वभावच असा आहे कीं, मऊ सांपडेल तेथें कोपरानें खणावें, पण त्यांतही कांहीं सारासार विचार करावा हेंच शहाणपण आहे. असो, पेरणीच्या वेळीं ह्या बिचाऱ्यांजवळ बीं नसलें म्हणजे सावकाराची किंवा मारवाडी शेटजीची पायधरणी करून बीं घ्यावें लागतें. मग त्यांची तुंबडी सुरू होते. घेतलेलें बीज चार महिन्यांनीं दिढीनें देण्याचा करार असतो, त्यांत अंतर पडलें कीं, फिर्याद होऊन लागलीच जप्ती तयार. मग बिचाऱ्याजवळ फाटक्या लंगोटी शिवाय कांहीं रहात नाहीं! सरा-

ईवर पट्टीची सुरुवात झाली कीं, पाटील कुळकर्णी ह्यांच्यां-वर स्वार होतात. त्यांच्या पायधरण्या करतां करतां डो-क्याची साल जाते. न्हाव्यानें हजामत केली कीं, शेतां-तल्या त्यानें बेलाशक पेंढ्या उचलून न्याव्या. जोडा किंवा मोट सांधली कीं, चांभाराचा हक्क झाला लागू. खळ्यावर महार, मांग, रामोशी, ह्यांचीं नेहमीं तोंडें दाबावीं लागतात. नाहीं तर उभ्याच्या उभीं शेतें किंवा रचून ठेवलेल्या सुड्या पार होतात. शिवाय सुतार, लोहार, परीट, इत्यादि भुतें पाठीस लागलेलीं असतातच. सारांश बिचारा शेतकरी चोहींकडून ग्रासला असतो. इतके हाल सोसून त्या बिचाऱ्यास मिळतें तरी काय? शेत उभें आहे तोंवर ओली कोरडी भाकर. शेताची मळणी होऊन धान्याची विल्हेवाट लागल्या नंतर दुसरें पीक येई तोंपर्यंत त्या बिचाऱ्या दुर्दैवी शेतकऱ्याचा गुजारा कसा होत असेल ते परमेश्वरास ठाऊक!!!

दयाळू इंग्रज सरकार आमचें मायबाप आहे. त्यां-च्या उत्पन्नाचा मोठा भाग काळी पासून येतो. ती रक्कम आमच्या शेतकऱ्यांच्या निदळच्या घामाची असते. आमच्या सरकारचें काम चालविणारे लाट साहेब, गवरन-र साहेब, रेविन्यु साहेब, व कलेक्टर साहेब, इत्यादि पुष्कळ अधिकारी आहेत. त्यांस जे बडे बडे पगार मिळतात ते कुठले? आमच्या शेतकऱ्यांच्या कष्टाचे. आमच्या शेतकऱ्यांपासून सरकार दरसाल धारा व लोक-लफंड ठेंचून घेतें, त्याबद्दल बिचाऱ्यांस मोबदला काय देतें? आमच्या सरकारचे बडे बडे अधिकारी संध्याकाळीं थंडोशांत दोन दोन चार चार घोड्यांच्या गाड्यांत बसून

मोठ्या मौजेनें फिरावयास जातात, त्या वेळीं भरदुपारी तापलेल्या वावरांत अनवाणी नांगर हांकीत फिरण्याचें सुख त्यांचे मनांत तरी येत असेल काय? ह्या गाड्या घोड्यांचे मिजाशी खर्च चालविण्याकरितां हजारों शेतकरी रात्रंदिवस शेतांत खपत असतात त्यांची आठवण तरी त्यांस होत असेल काय? हे बडे अधिकारी आपल्या श्रीमंती बंगल्यांत परांच्या मऊ गाद्यांवर निजतात तेव्हां उघड्यांत ओल्या जमिनीवर रकटें टाकून झोंपी जाणाऱ्या शेतकऱ्यांचें सुख त्यांचे मनांत तरी येत असेल काय? ते आपल्या इष्टमित्रांस मेजवान्या देतात त्यावेळेस मिटक्या मारून मिष्टान्ने भक्षण करतात. त्यासमयीं आमचे शेतकरी दोन दोन दिवसांच्या शिळ्या भाकरीचे तुकडे कांदा लसणीबरावर किंवा मीठ मिर्ची बराबर खातात, व गाजरें, वांगी, मूग व मटक्या ह्यांची वरव करून महिन्याच्या महिने लोटतात तेव्हां त्या निरस अन्नाची काय गोडी असेल ह्याची कल्पना तरी त्यांचे मनांत येत असेल काय? महिना भरतांच आमचे बडे अधिकारी पगाराच्या रुपयांचे ढिगांचे ढीग पारखून नेतात. तेव्हां हा ढीग उभा करण्यास किती लोकांच्या अंगांतून घामाच्या धारा वाहिल्या, कितीकांच्या घरादारांचें वाटोळें करावें लागलें, कितीकांचीं पोरेंबाळें उघडीं पाडावी लागलीं. किती लोक अन्न अन्न करीत भडकत गेले, ह्याचा विचार कधीं तरी त्यांच्या मनांत येत असेल काय? ज्यांच्यावर आपण राज्य करतों त्या बिचाऱ्या गरीब व अज्ञान शेतकऱ्यांच्या अतोनात कष्टांबद्दल ह्या महिन्यास आपण त्यांची काय फेड केली ह्याचा हिशेब

ते कधीं तरी बघीत असतील काय? बघण्याचें लक्ष
कांहींच अनुभवास येत नाहीं. तेव्हां होय तरी का
ह्मणवेल. दयाळू देवानें ह्या दीन व अनाथ शेतकऱ्यां
वर कृपादृष्टी करून त्यांचें कल्याण करण्याची आमच्य
लोकांच्या व मायबाप इंग्रज सरकारच्या अधिकारी मंडळा
च्या मनांत चांगली प्रेरणा करावी अशी त्यास हात जोडू
प्रार्थना करितों.

## शेतकीची जमीन.

जमिनीचे प्रकार अनेक आहेत. डोंगराळ व खडका
ळ अशा जमिनींत चांगलें पीक येत नाहीं. म्हणून ब
हुधा ती ओसाड टाकतात तिजवर रुजणारें गवत गुरें
चालून चारतात, व शेवटीं राहील तें कापून आणून गु
रांच्या वगैरे कामीं लावतात. अशा जमिनीवर लहान
मोठीं झाडें वाढतात. तीं तोडून सरपणास जाळतात
किंवा इमारतीच्या कामीं लावतात. असल्या जमिनीस
गायरान, कुरण, किंवा वनचराईची जमीन असें म्हणतात.

पिकाऊ जमिनीस वहित जमीन असें म्हणण्याचा पाठ
आहे. तींत बागाईत, जिराईत, व तरी असे भेद आहेत.
जीस उन्हाळ्यांत पाटाचें किंवा मोटेचें पाणी सांपडतें
तीस बागाईत जमीन म्हणतात. तींत बारमास अनेक
प्रकारच्या शाखभाज्या, फळफळावळ, व शेत उदीम कर
तां येतात. जिला पावसाखेरीज पाणी मिळण्याची सोय
नसते तिला कोरडवाहो किंवा जिराइत जमीन ह्मणतात,
भात खांचराच्या जमिनीस तरी असें म्हणतात. तरी ज

मीन मावळांत व कोंकणांत फार असते. देशांत ती क्कचित आढळते. ह्या सर्व प्रकारच्या जमिनींत उत्तम, मध्यम, व कनिष्ट अशा प्रति असतात. म्हणून जमिनीचा मगदूर पाहून तींत होण्याजोगा असेल तोच उद्दीम करावा लागतो.

केवळ पावसाच्या पाण्यानें पिकणारी अशी जिराइत जमीन असते. तिच्या पिकाचे हंगाम दोन. त्यांतल्या पहिल्यास खरीप, व दुसऱ्यास रबी अशीं नांवें आहेत. पर्जन्यकालास आरंभ होऊन मृगाचा पाऊस सुरू होतांच ज्या पेरण्या होऊं लागतात त्या पूर्व पिकास खरीप म्हणतात. खरिपाचीं मुख्य धान्यें म्हटली म्हणजे भात, नाचणी, वरी, तीळ, हरीक, व इतर कड धान्यें; हीं कोंकणांत व मावळांत पेरतात. आणि बाजरी, आरगडी, मूग, उडिद, तूर, भुइमूग, व कापूस इत्यादि धान्यें देशांतल्या जमिनींत पेरतात. यांतील हळवीं पिकें लवकर येणारीं व महान पिकें उशिरानें येणारीं असल्यामुळें पेरणी झाल्यापासून कांहीं तीन महिन्यांत, व कांहीं चार पांच महिन्यानीं हातीं येतात.

रबीच्या पिकास उत्तर धान्येंही म्हणतात. पूर्वा नक्षत्राच्या अखेरीस आरंभ होऊन हस्त नक्षत्र सरे तोंवर रबीच्या पेरण्या चालतात. रबीच्या पिकाचीं मुख्य धान्यें शाळू, (जोंधळे,) गहूं, हरभरा, कापूस, जवस, करडी इत्यादि असतात. हीं पिकें माघ व फाल्गुन अखेरी पर्यंत हातीं येतात.

मावळ व कोंकण प्रांतांत बहुतेक पिकें खरिपाचीं होतात. रबीची बहुत करून होत नाहींत; कारण तिकडली जमीन सपाट कमी, उतरतीच फार. व तेथें पाऊ-

स फार पडतो, यामुळें जमिनीचा पृष्ठभाग धुतला जाऊन रेताड जमीन खालीं राहते. या कारणानें अशा जमिनींत पडलेलें पाणी शोषून घेण्याचा व पावसाळा सरल्यावर चार चार महिने पर्यंत आपल्यावर वाढणाऱ्या पिकांस पाण्याचा पुरवठा करण्याचा दम राहात नाहीं. यामुळें वर्षाकालांत पडणाऱ्या पाण्याच्या आटोक्यांत हातीं येणारीं अशीं खरिपाचीं पिकें मात्र त्यांस सांपडतात. रबीचीं पिकें त्यांस अगदींच अंतरतात. ही स्वाभाविक स्थिति असल्यामुळें कोणाचा इलाज चालत नाहीं.

देशामध्यें खरीप व रबी हीं दोन्ही पिकें करण्याचा संप्रदाय आहे. तथापि जमीन रूक्ष व हलकी म्हणजे दमदार नसते तींत खरीप, व काळसर आणि दमदार जमिनींत रबीचीं पिकें करण्याची वहिवाट आहे. देशांतील कांहीं कांहीं जमिनींत पहिल्यानें खरिपांतील हळव्या धान्याचीं पिकें काढून घेतात. आणि त्या जमिनींत लागलीच रबीचे पेरे करतात. पर्जन्यकाल लवकर सुरू झाला तर अशीं दोन पिकें पुष्कळ ठिकाणीं करण्यास कांहीं अडचण पडत नाहीं.

जमिनीच्या जाति, तिची योग्यता, तिजमधील कस, व पिकाचे हंगाम इत्यादि गोष्टी शेतकऱ्यांच्या मुलांनीं चांगल्या शिकून ध्यानांत धराव्या. कारण असल्या गोष्टींचें ज्ञान लहानपणीं होऊन मनांत ठसलें तर मोठेपणीं त्यांस फार उपयोगीं पडेल. हें समजून असल्या गोष्टींची चांगली माहिती करून त्याजवर नेहेमी नीट विचार करीत जावा.

# शेतकऱ्यांची स्थिति सुधारण्याचे उपाय.

आमच्या शेतकऱ्यांची स्थिति फार वाईट आहे. त्यांचे निरंतर हाल होत आहेत. जो तो मारझोड करून त्यांस लुटीत आहे हें वर दाखविलें, परंतु एवढ्यानें कार्य उरकत नाहीं. आमची स्थिति कठीण आहे असें नुसतें बोलून नर आपण रडत बसलों तर काय होणार? घरास आग लागलेली पाहून आतां माझ्या पोरांबाळांचें कसें होईल असें म्हणून रडत बसल्यानें आग विझेल का! नाहीं. तर धैर्यानें उठून धांवाधांव केली पाहिजे. घरांतलीं पोरें-बाळें व चीजवस्त सांपडेल तेवढी ओढून काढली पाहिजे. ओरडाआरड करून माणसें जमविली पाहिजेत. चार-चौघांस मदत घेऊन आगीवर पाणी टाकण्याची जलदी केली पाहिजे. तरच आग लवकर विझून संकट दूर होईल, तसेंच आतां केलें पाहिजे. दुसरा इलाज नाहीं.

शेतकरी मित्रहो; तुम्हास ह्या दैन्य स्थितिपासून फार त्रास होत असेल, तुमच्या मनास अत्यंत वाईट वाटत असेल, तुमचें काळीज करपत असेल, व चोहींकडून तुम्ही पोळत असल्यामुळें घाबरलाही असाल हें खरें, पण जरा धीर धरा. क्षणभर दुःख गुंडाळून ठेवा, आणि तुम्हावर आलेल्या संकटाचा परिहार कोणत्या उपायानें होईल ह्याचा शांतपणानें नीट विचार करा, ह्मणजे तुम्हास मार्ग दिसूं लागेल..

तुमची स्थिति तुमचे मनांत उभी राहिली ह्मणजे तुम्ही परमेश्वरास अनन्यभावें शरण जाऊन त्याची प्रार्थना

करीत असाल, व तो तुमची दाद घेत नाहीं म्हणून त्यास बोलही लावीत असाल, परंतु हें गैर आहे. तुमच्या डोळ्यांतून टिपें गळतात, आंगांतून घामाच्या धारा चालतात, व तुम्हावर जीं घोर संकटें कोसळतात तीं सर्व तेथें रुजू आहेत, परंतु तुम्ही होऊन आपल्या दुःखनिवृत्तीचे कांहींच उपाय न कराल तर तो तुम्हास मदत तरी कशी करील? तुमची वास्तविक स्थिति काय आहे ती तुम्ही लोकांपुढें नीट रीतीनें मांडाल व सरकारचे कानावर घालाल तर कांहीं तरी खचित उपयोग होईल. फार कशाला, अति अज्ञान, दुर्बल, व मुक्या लेंकरास भूक लागली असतां जर तें रडलें नाहीं तर प्रत्यक्ष माता त्याकडे लक्ष न देतां ती आपल्या कामांत गर्क राहते. पण त्या तान्ह्यानें रडण्यास आरंभ करून मोठ्यानें टाहो फोडला कीं, हातचें काम टाकून किंवा अर्धेंच जेवण सोडून मोठ्या घाईनें त्याकडे जाते, त्याला काय झालें हा नीट तपास करते, आणि मोठ्या ममतेनें त्यास उचलून घेऊन त्याची क्षुधा शांत करते. अशीं उदाहरणें सर्वांच्या घरोघर नेहेमीं दृष्टीस पडत असतां तुम्ही त्यापासून बोध करून न घ्याल तर तुमचें दैन्य व दुःख कसें निवारण होईल? हें तुम्हीच आपल्या मनांत विचार करून बघाल तर ध्यानांत येईल.

प्रयत्नांतीं परमेश्वर कसा पावतो हें वरील तान्ह्या लेंकराच्या उदाहरणावरून तुम्हास कळलेंच आहे. तुम्ही तर मर्दासारखे मर्द, देवानें तुह्मास हात दिले आहेत, पाय दिले आहेत, बोलायला तोंड दिलें आहे. विचार करण्यास मन व बुद्धि इत्यादि मोठालीं साधनें त्याणें देऊन ठेवलीं आहेत. एवढ्या प्रचंड तयारीचा भरणा तुमच्या जवळ आहे त्याचा

युक्तीनें व शहाणपणानें उपयोग करूं लागाल तर तुमचे पांग खचित फिटतील. पहिल्यानें तुम्ही आपली खरी स्थिति उजेडांत ठेऊन सर्व लोकांस व सरकारास दाखवा. ती हृदयभेदक व करुणापर शब्दांनीं वारंवार स्वमुखानें त्यांच्या कानांत शिरवा. त्यांस तुमच्या स्थितीचा विसर न पडावा म्हणून लेखन व भाषणद्वारा एकसारखी झोड उडवून द्या, म्हणजे त्यांचीं मनें तयार होतील. अशा रीतीनें तुमची खरी स्थिति त्यांच्यापुढें मांडाल तर कोणास करुणा येणार नाहीं? कोणाच्या हृदयास प्रेमाचा पाझर फुटणार नाहीं? कोणाच्या काळजास घरें पडणार नाहींत? पण तुम्हीच हाल सोसून मुकाटयानीं बसलां तर कांहीं होणार नाहीं. 'आपकरेसो काम' ही म्हण पक्की ध्यानांत धरा. भाडयाच्या माणसानीं काम कितपत उठतें हें तुम्हास ठाऊकच आहे. आपण जातीनें जेव्हां कंबर बांधतो तेव्हांच मनांत आणलेलें कार्य पूर्ण सिद्धीस जातें हें तुम्हास सांगायला नको.

आमचें सरकार मायबाप असल्यामुळें मोठ्या ममतेनें तुमच्या कल्याणाचे अनेक उपाय योजीत आहे. त्यांची कितीही वाखाणणी केली तरी थोडीच. परंतु तुमचीं दुःखें व अडचणी काय आहेत, तुम्हास कोण कोणत्या गोष्टींची गरज आहे; सध्यां सरकार मार्फत होणारे उपचार तुह्मास कितपत साधक बाधक आहेत हें तुम्हीच त्यांस कळविलें पाहिजे. त्याखेरीज सरकारास व लोकांस तुमची खरी स्थिति कळण्याचा मार्ग नाहीं. सरकारानें व इतर लोकांनीं तुमच्यावर कितीही दया केली, श्रम केले, व द्रव्यही पुष्कळ खर्चलें, तरी तुम्ही पुढें सरसावून जें

कार्य होणार आहे तें बाहेरच्या लोकांकडून कदापि व्हाव-याचें नाहीं. 'दुसऱ्याच्या हातून ताहान भागत नाहीं.' हें तुमच्या लक्षांत असेलच. सगळ्या गोष्टीचें सार हेंच कीं, तुम्ही आपलें दुःख, दारिद्र्य, व अज्ञान, घालविण्याक-रितां जातीनें कंबरा बांधा, म्हणजे देव तुमचा पांग फेडील.

## शेतजमीन तयार करणें.

धान्याची पेरणी करण्यापूर्वी शेताची जमीन तयार करावी लागते. मेहेनत मशागत करून जमीन तयार न करतां धान्य पेरलें तर पीक चांगलें येत नाहीं. म्हणून अनेक संस्कार करून शेतकरी लोक अगोदरच जमीन चांगली तयार करून ठेवतात.

पूर्वीचें पीक निघून जमीन खुली झाली ह्मणजे ति-च्यांत दम आहे तोंच ती नांगरतात. दमदार जमीन नांगरण्यास हलकी जाते. खडखडीत वाळल्यावर नांगरूं लागल्यास फाळ तिच्यांत खोल शिरत नाहीं, व माती आंव-ळून बसल्यामुळें बैलांस ओढण्यास फार जड जाते. म्हणून वेळांत वेळ करून जमीन थोडी ओलसर आहे तोंच नांगरावी हें चांगलें. जमीन दरसाल नांगरली तर चांगली. पण कांहीं चांगल्या जमिनी एक सालाआड नांगरतात. देशांतल्या कांहीं ठिकाणच्या सरस जमिनी तर दहा वीस वर्षांनीं एकदां नांगरतात. नांगराच्या खा-लच्या बाजूस लोखंडाचा फाळ हातभर लांब बसविलेला अस-तो. तो जमिनीवर उभा दाबून धरून नांगराचे बैल-हांकले म्हणजे फाळ जमिनींत शिरतो. तेणेंकरून हात

पाऊण हात जमीन खोल उखळली जाते. शेतकऱ्याचे अनुकूलतेप्रमाणें व जमिनीच्या मगदुराप्रमाणें प्रत्येक नांगरास दोनपासून दहा बारा पर्यंत बैल जुंपतात. नांगर धरणारा गडी हुशार व जोरदार लागतो. कारण नांगऱ्याच्या अंगीं मोठी शक्ती असली तरच फाळ खोल जातो, व हुशार असला म्हणजे तासा शेजारी तास पडतें. नांगऱ्या गडी अशक्त व गैबती असल्यास जमीन खोल उकरली जात नाहीं. आणि तासाशेजारी तास चालविण्याचें धोरण चुकून पुष्कळ फटी पडतात. सगळे शेतकरी एक वेळ नांगरणी करितातच, पण कांहीं लोक नांगरठीची दुसारणीही करितात. तेणेंकरून जमीन अधिकच सईल होते.

नांगरणीच्या योगानें जमिनीचा अंतरभाग मोकळा होऊन वर येतो. आणि मग त्याजवर दयवर पडून व उन्हाच्या तापी बसून मृत्तिकेमध्यें पिकाऊपणाचे गुण वाढतात. शेतकीस जमीन तयार करण्याच्या व्यवसायांत नांगरणीचें काम मोठें आहे. तें जितकें चांगलें करावें तितकी जमिनीची तयारी अधिक होते.

कोंकणची व मावळची जमीन फार हलकी असल्यामुळें ती दरसाल नांगरावीच लागते. तेथले नांगर दोन बैली असतात. शिवाय तेथें पाऊस फार पडत असल्यामुळें जमिनीचा कस धुपून जातो. ह्मणून तिकडल्या जमिनींत देशांतल्या जमिनीप्रमाणें चिकणाई नसते. कोंकणांत व मावळांत सपाट जमिनी थोड्या. उतरत्या जमिनीच फार. यामुळें तिजवर पाऊस लागतांच तिच्या पृष्ठभागावरची माती वाहूं लागते. तेणेंकरून तिजमधील सत्व कमी

करीत असाल, व तो तुमची दाद घेत नाहीं म्हणून त्यास बोलही लावीत असाल, परंतु हें गैर आहे. तुमच्या डोळ्यांतून टिपें गळतात, आंगांतून घामाच्या धारा चालतात, व तुम्हावर जीं घोर संकटें कोसळतात तीं सर्व तेथें रुजू आहेत, परंतु तुम्ही होऊन आपल्या दुःखनिवृत्तीचे कांहींच उपाय न कराल तर तो तुम्हास मदत तरी कशी करील? तुमची वास्तविक स्थिति काय आहे ती तुम्ही लोकांपुढें नीट रीतीनें मांडाल व सरकारचे कानावर घालाल तर कांहीं तरी खचित उपयोग होईल. फार कशाला, अति अज्ञान, दुर्बल, व मुक्या लेंकरास भूक लागली असतां जर तें रडलें नाहीं तर प्रत्यक्ष माता त्याकडे लक्ष न देतां ती आपल्या कामांत गर्क राहते. पण त्या तान्ह्यानें रडण्यास आरंभ करून मोठ्यानें टाहो फोडला कीं, हातचें काम टाकून किंवा अर्धेंच जेवण सोडून मोठ्या घाईनें त्याकडे जाते, त्याला काय झालें हा नीट तपास करते, आणि मोठ्या ममतेनें त्यास उचलून घेऊन त्याची क्षुधा शांत करते. अशीं उदाहरणें सर्वांच्या घरोघर नेहेमीं दृष्टीस पडत असतां तुम्ही त्यापासून बोध करून न घ्याल तर तुमचें दैन्य व दुःख कसें निवारण होईल? हें तुम्हीच आपल्या मनांत विचार करून बघाल तर ध्यानांत येईल.

प्रयत्नांतीं परमेश्वर कसा पावतो हें वरील तान्ह्या लेंकराच्या उदाहरणावरून तुम्हास कळलेंच आहे. तुम्ही तर मर्दासारखे मर्द, देवानें तुह्मास हात दिले आहेत, पाय दिले आहेत, बोलायला तोंड दिलें आहे. विचार करण्यास मन व बुद्धि इत्यादि मोठालीं साधनें त्याणें देऊन ठेवलीं आहेत. एवढ्या प्रचंड तयारीचा भरणा तुमच्या जवळ आहे त्याचा

युक्तीनें व शहाणपणानें उपयोग करूं लागाल तर तुमचे पांग खचित फिटतील. पहिल्यानें तुम्ही आपली खरी स्थिति उजेडांत ठेऊन सर्व लोकांस व सरकारास दाखवा. ती हृदयभेदक व करुणापर शब्दांनीं वारंवार स्वमुखानें त्यांच्या कानांत शिरवा. त्यांस तुमच्या स्थितीचा विसर न पडावा म्हणून लेखन व भाषणद्वारा एकसारखी झोड उडवून द्या, म्हणजे त्यांचीं मनें तयार होतील. अशा रीतीनें तुमची खरी स्थिति त्यांच्यापुढें मांडाल तर कोणास करुणा येणार नाहीं? कोणाच्या हृदयास प्रेमाचा पाझर फुटणार नाहीं? कोणाच्या काळजास घरें पडणार नाहींत? पण तुम्हीच हाल सोसून मुकाटयानीं बसलां तर कांहीं होणार नाहीं. ‘आपकरेसो काम’ ही म्हण पक्की ध्यानांत धरा. भाडयाच्या माणसानीं काम कितपत उठतें हें तुम्हास ठाऊकच आहे. आपण जातीनें जेव्हां कंबर बांधतो तेव्हांच मनांत आणलेलें कार्य पूर्ण सिद्धीस जातें हें तुम्हास सांगायला नको.

आमचें सरकार मायबाप असल्यामुळें मोठ्या ममतेनें तुमच्या कल्याणाचे अनेक उपाय योजीत आहे. त्यांची कितीही वाखाणणी केली तरी थोडीच. परंतु तुमचीं दुःखें व अडचणी काय आहेत, तुम्हास कोण कोणत्या गोष्टींची गरज आहे; सध्यां सरकार मार्फत होणारे उपचार तुह्मास कितपत साधक बाधक आहेत हें तुम्हीच त्यांस कळविलें पाहिजे. त्याखेरीज सरकारास व लोकांस तुमची खरी स्थिति कळण्याचा मार्ग नाहीं. सरकारानें व इतर लोकांनीं तुमच्यावर कितीही दया केली, श्रम केले, व द्रव्यही पुष्कळ खर्चलें, तरी तुम्ही पुढें सरसावून जें

कार्य होणार आहे तें बाहेरच्या लोकांकडून कदापि व्हाव-याचें नाहीं. 'दुसऱ्याच्या हातून ताहान भागत नाहीं.' हें तुमच्या लक्षांत असेलच. सगळ्या गोष्टीचें सार हेंच कीं, तुम्ही आपलें दुःख, दारिद्र्य, व अज्ञान, घालविण्याक-रितां जातीनें कंबरा बांधा, म्हणजे देव तुमचा पांग फेडील.

## शेतजमीन तयार करणें.

धान्याची पेरणी करण्यापूर्वीं शेताची जमीन तयार करावी लागते. मेहेनत मशागत करून जमीन तयार न करतां धान्य पेरलें तर पीक चांगलें येत नाहीं. म्हणून अनेक संस्कार करून शेतकरी लोक अगोदरच जमीन चांगली तयार करून ठेवतात.

पूर्वीचें पीक निघून जमीन खुली झाली ह्मणजे ति-च्यांत दम आहे तोंच ती नांगरतात. दमदार जमीन नांगरण्यास हलकी जाते. खडखडीत वाळल्यावर नांगरूं लागल्यास फाळ तिच्यांत खोल शिरत नाहीं, व माती आंव-ळून बसल्यामुळें बैलांस ओढण्यास फार जड जाते. म्हणून वेळांत वेळ करून जमीन थोडी ओलसर आहे तोंच नांगरावी हें चांगलें. जमीन दरसाल नांगरली तर चांगली. पण कांहीं चांगल्या जमिनी एक सालाआड नांगरतात. देशांतल्या कांहीं ठिकाणच्या सरस जमिनी तर दहा वीस वर्षांनीं एकदां नांगरतात. नांगराच्या खा-लच्या बाजूस लोखंडाचा फाळ हातभर लांब बसविलेला अस-तो. तो जमिनीवर उभा दाबून धरून नांगराचे बैल-हांकले म्हणजे फाळ जमिनींत शिरतो. तेणेंकरून हात

पाऊण हात जमीन खोल उखळली जाते. शेतकऱ्याचे अनुकूलतेप्रमाणें व जमिनीच्या मगदुराप्रमाणें प्रत्येक नांगरास दोनपासून दहा बारा पर्यंत बैल जुंपतात. नांगर धरणारा गडी हुशार व जोरदार लागतो. कारण नांगऱ्याच्या अंगीं मोठी शक्ती असली तरच फाळ खोल जातो, व हुशार असला म्हणजे तासा शेजारी तास पडतें. नांगऱ्या गडी अशक्त व गैबती असल्यास जमीन खोल उकरली जात नाहीं. आणि तासाशेजारी तास चालविण्याचें धोरण चुकून पुष्कळ फटी पडतात. सगळे शेतकरी एक वेळ नांगरणी करितातच, पण कांहीं लोक नांगरठीची दुसारणीही करितात. तेणेंकरून जमीन अधिकच सईल होते.

नांगरणीच्या योगानें जमिनीचा अंतरभाग मोकळा होऊन वर येतो. आणि मग त्याजवर दयवर पडून व उन्हाच्या तापी बसून मृतिकेमध्यें पिकाऊपणाचे गुण वाढतात. शेतकीस जमीन तयार करण्याच्या व्यवसायांत नांगरणीचें काम मोठें आहे. तें जितकें चांगलें करावें तितकी जमिनीची तयारी अधिक होते.

कोंकणची व मावळची जमीन फार हलकी असल्यामुळें ती दरसाल नांगरावीच लागते. तेथले नांगर दोन बैली असतात. शिवाय तेथें पाऊस फार पडत असल्यामुळें जमिनीचा कस धुपून जातो. ह्मणून तिकडल्या जमिनींत देशांतल्या जमिनीप्रमाणें चिकणाई नसते. कोंकणांत व मावळांत सपाट जमिनी थोड्या. उतरत्या जमिनीच फार. यामुळें तिजवर पाऊस लागतांच तिच्या पृष्ठभागावरची माती वाहूं लागते. तेणेंकरून तिजमधील सत्व कमी

होत जातें. कोंकणांत व मावळांत भात, नाचणी, आणि वरी ह्या धान्याचीं रोपें तयार करण्यास जमीन भाजावी लागते. त्याचें कारण हेंच कीं, हिरव्या जमिनींतील सत्व पाण्यानें वाहून गेल्यामुळें तिजवर झाडांचा पाला, शेण, व गवत वगैरे पदार्थ घालून दाढ भाजली म्हणजे जमीन खतावली जातें. नंतर तींत धान्याची पेरणी केल्यानें रोप जोरानें वाढतें. तेथें वीत दीड वीत रोप वाढल्यावर त्यास उपटून काढतात. आणि भाताचीं रोपें गुडव्या इतक्या चिखलांत एके ठिकाणीं दोन दोन तीन तीन काड्या अशा रीतीनें विती वितीच्या अंतरानें आवे लावतात, त्यास लावणी म्हणतात. नाचणी व वरिचीं रोपें उपटून तयार केलेल्या जमिनीवर त्यांची विती वितीच्या अंतरानें एक एक काडी टाकून देतात त्यास अवठणी म्हणतात. देशांतल्या जमिनीची भाजपोळ करावी लागत नाहीं. तिला नांगरून पाळ्या घातल्या म्हणजे ती पेरणीस तयार होते.

देशांतली जमीन नांगरल्यावर कांहीं दिवसांनीं तिजवर कुळव धरून पाळ्या घालतात. नांगरठीच्या योगानें जमिनीचीं ढेकळें वर येऊन पूर्व पिकाचीं व रानाचीं मूळखंडें सहज उघडीं पडतात. मातीचीं ढेकळें फुटावीं, मुळ्या व इतर केरकचरा गोळा होऊन बाहेर पडावा, आणि जमीन साफ व मोकळी व्हावी हाच पाळ्या घालण्याचा हेतु असतो. कुळवाच्या खालच्या बाजूस लांकडाचीं दोन जानवळीं व लोखंडी एक फास बसविलेला असतो. अशा कुळवास दोन बैल जुंपून ते हाकले म्हणजे जानवळ्याच्या योगानें जमीन किंचित उकरली जाते. आणि

फासाच्या योगानें ढेंकळें फुटून रान व मुळ्या गोळा हो-ऊन येतात. पाळ्या घालण्याचें काम चालू झालें ह्मणजे कुळवाच्या पाठीमागें मूळखंडें व तण निवडण्यास माणसें लागतात. नांगरणी झाल्यावर दोन तीन पाळ्या घाल-तातच. परंतु जितक्या पाळ्या अधिक घालाव्या व मुळ्या निवडून काढाव्या तितक्या चांगल्याच. चिकट-लेल्या वेणीचे केंस तेल लावून अनेक वेळ विंचरले ह्म-णजे ते जसे मोकळे व स्वच्छ होतात. त्याप्रमाणें अनेक पाळ्या घातल्यानें जमीन अगदीं मोकळी व स्वच्छ होते. म्हणून पाळ्या घालण्याची हयगय न करितां शेतकऱ्यांनीं त्या घालण्यास फार जपावें.

पाळ्या घालण्याचें काम कांहीं शेतकरी उन्हाळ्यांत करतात. व कांहीं लोक पाऊस पडल्यावर करतात. नांगरठीचीं ढेंकळें फुटलेलीं नसल्यामुळें उन्हाळ्यांत तीं बैलांच्या पायांस फार जाचतात. म्हणून एक दुसरा पाऊस पडून ढेंकळें पाण्यानें विरघळल्यावर पाळ्या घा-तल्या म्हणजे बैलास हलकें जातें. पण अशा वेळीं अवकाश थोडा राहून पेरणीचें नेट मागें लागलें असतें. म्हणून सवड असेल तेव्हां अगोदरच पाळ्या घालण्याची तजवीज करीत जावी. जमिनीची नांगरणी होऊन पाळ्या घातल्या म्हणजे जमीन तयार झाली. त्याच्या पुढलें काम पेरणीचें. जमीन तयार करण्याचा मुख्य हेतु शेतकऱ्यांच्या मुलांनीं ध्यानांत आणून त्याप्रमाणें पुढें वागावें.

# शेतकऱ्यांची स्थिति सुधारण्यास शिक्षणाची अवश्यकता.

शेतकऱ्यांची स्थिति सुधारण्याचे उपाय वर लिहिले, परंतु या गोष्टी त्यांचे हातून कशा व्हाव्या? हा मोठा प्रश्न उभा राहतो. त्याचें समाधान केलें पाहिजे. वरील उपाय करण्याचे पूर्वी शेतकरी लोकांच्या आंगीं बराच समंजसपणा आला पाहिजे. त्यावांचून असें करणें व्यर्थ होईल. म्हणून प्रथम शेतकरी लोकांस चांगलें शिक्षण दिलें पाहिजे.

कोणत्याही देशाची स्थिति सुधारूं लागण्याचे पूर्वी तेथले लोक सुशिक्षित झाले पाहिजेत. म्हणजे सर्व गोष्टी फलदायक होऊं लागतील. त्याखेरीज अन्य उपायांस जोर येणार नाहीं. आमच्या देशाच्या लोकवस्तींत शेतकऱ्यांचा वर्ग फार मोठा असून तो अडाणी आहे. ह्या देशास इतकें दारिद्र्य येण्याचें मुख्य कारण हेंच होय. तें दूर करण्यास कोणचे उपाय योजावे ह्या विचाराकडे सर्व विद्वानांचें लक्ष लागलें आहे. अनेक व्यक्तींचे अनेक विचार आहेत, परंतु आमच्यामतें शेतकऱ्यांस शिक्षण दिल्यानें हळू हळू त्यांच्या सर्व अडचणी दूर होतील.

ज्ञानदृष्ट्या शिक्षणाचे कामांत आमच्या शेतकऱ्यांस सध्यां ओनामाच दिला पाहिजे. रयत म्हणजे काय, सरकार म्हणजे काय, रयतेचा व सरकारचा परस्परांशीं संबंध काय आहे, वगैरे गोष्टी त्यांस मुळींच कळत नाहींत. त्यांचें सरकार काय तें वसूल करणारे पाटील, कुळकर्णी अगर फार झालें तर मामलेदार. या पलीकडे

[library stamp]



कलेक्टर व गवरनर हीं नांवें मात्र ठाऊक असतील, पण त्यांचा हुद्दा काय, त्यांजकडे काम कोणतें असतें, हें त्यांचे स्वप्नींही येत नसेल. एखादा नवीन कर बसला अगर धारे वाढले म्हणजे फार तर मामलेदारांपर्यंत ते कुरकूर करतात. परंतु या गोष्टींत कमी ज्यास्त करणें त्यांचे हातीं नाहीं हें त्यांस समजत नसतें. शेवटीं झालेल्या गोष्टीस रूकार देऊन स्वस्थ बसतात. परंतु त्यांस शिक्षण मिळाल्यावर असें होणार नाहीं. आणि शिक्षणाच्या योगानें शेतकामास मोठा उपयोग होईल.

शेतकऱ्यांचे हाल कसे कमी होतील हें आतां पाहिलें पाहिजे. खेड्यापाड्यांत एखादा तरी मारवाडी असतो. तो पहिल्यानें देशांतून येतो तेव्हां त्याजवळ फक्त पाणी पिण्याचा लोटा मात्र असतो. परंतु थोड्याच वर्षांत तो मोठा द्रव्यवान शेट बनतो. असे कां होतें ? तो मोठा विद्वान किंवा शेतकऱ्यांसारखा जबर मेहेनती असतो असें नाहीं. त्यास थोडें लिहितां वाचतां येत असून हिशेब मात्र समजतात. या पलीकडे विचित्र असें कांहीं नसतें. परंतु तेवढ्याचाच ठाकाठिकीनें उपयोग करून पैसा पैसा गांठून संग्रह कसा करावा हें त्यांस पक्कें कळत असतें. तेवढ्याच गुणावर मिळेल त्याचा मितव्यय करून हजारों मारवाडी लोक आमच्या दरिद्री देशांतच श्रीमान होऊन जात आहेत. हा तरी ज्ञानाचाच प्रभाव आहे. मग विद्येच्या योगानें शेतकऱ्यांस कांहींच का उपयोग होणार नाहीं ?

पण शेतकऱ्यांस येवढी विद्या कशी मिळावी? सरकारानें हजारों रुपये खर्चून लोकांस विद्या देण्याकरितां म्हणू-

न शाळा घातल्या आहेत. परंतु त्यांपासून शेतकऱ्यांस व्हावा तसा उपयोग होत नाहीं. मग विद्या मिळणें अवश्य आहे ही गोष्ट त्यांचे मनांत येऊन काय उपयोग? सरकारी शाळांत शेतकऱ्यांस अवश्य असें शिक्षण मिळत नाहीं खरें, परंतु तेवढ्यावरून निराश होऊन बसण्याचें कारण नाहीं. देवाच्या दयेनें या कामास साह्यकारक अशी एक संधी जवळ आली आहे.

आपल्या देशाचे हल्लींचें मुख्याधिकारी लार्ड रिपन साहेब हे स्वभावानें फार दयाळू व मोठ्या मनाचे आहेत. आपल्या लोकांचें कल्याण करण्याकरितां ते फार श्रम घेताहेत. लोकांस विद्या शिक्षण मिळाल्यावांचून त्यांचें खरें कल्याण होणार नाहीं अशी त्यांची पक्की खात्री झाली आहे. म्हणून त्याणीं एक गोष्ट फार चांगली आरंभिली आहे. लोकांस विद्या शिक्षण देण्याकरितां सन १८५४ सालीं सरकारी विद्याखातें सुरू होऊन त्याच्या द्वारें जागोजाग शाळा घातल्या आहेत. त्यापासून मिळणारें शिक्षण लोकांस किती उपयोगाचें आहे, तें लोकांस पसंत आहे कीं नाहीं. व त्यांत कोणते फेरफार करणें अवश्य आहे, इत्यादि गोष्टींचा नीट शोध व चौकशी करण्याकरितां सध्या एक मंडळी नेमली आहे. ही मंडळी आपल्या सर्व देशभर जागोजाग फिरून तेथील लोकांच्या साक्षी व मतें घेत आहे. अशा वेळीं शेतकरी लोकांस कोणत्या गोष्टी शिकविणें अवश्य आहे व सध्यां शिक्षणाच्या संबंधानें त्यांच्या काय गैरसोयी आहेत ह्या स्पष्ट लिहून जागोजागच्या शेतकरी लोकांनीं आपले अर्ज ह्या कमिटीकडे पाठविले असतां फार उपयोग होईल. आणि शाळांच्या

संबंधानें ज्या व्यवस्था असाव्याशा वाटतात त्या आपोआप होतील.

## पेरणी करणें व कोळपणें.

शेताची जमीन कशी तयार करतात हें पूर्वीं सांगितलेंच आहे. कोंकणची व मावळची जमीन अगोदर भाजून मग त्या भाजक्या जमिनीवर शेताचें रोप तयार करावें लागतें. तशी देशांतली जमीन भाजावी लागत नाहीं. तिला चांगली नांगरली व तिजवर खत घालून अनेक वेळ पाळ्या घातल्या म्हणजे ती तयार होते, हा मुख्य भेद वाचणाऱ्यांनीं ध्यानांत ठेवावा.

जिराईत जमिनीवर पेरणी करण्याचे हंगाम दोन असतात. पर्ज्यन्य कालाच्या आरंभाबराबर हंगाम सुरू होतो त्यास खरीप, व उत्तरा नक्षत्रांत हंगाम सुरू होतो त्यास रबी असें म्हणतात. मावळांत व कोंकणांत खरिपाचे हंगामावरच सगळीं शेतें पेरतात. रोहिणी नक्षत्राच्या अखेरीस धूळवाफेवरच मावळांत घांट माथ्या नजीकच्या भागांत पेरण्या करतात. पाऊस पडो कीं न पडो केवळ परमेश्वरावर भरंवसा ठेऊन बेलाशक सगळीं शेतें पेरतात. कोंकणांत व मावळच्या कांहीं भागांत अगोठीचा एक पर्जन्य पडला म्हणजे पेरणीची सुरुवात होते. मावळ व कोंकण प्रांतांत धान्याची पेरणी पाभारीनें करीत नाहींत. एका टोपलींत भात किंवा नाचण्या घेतात आणि हाताच्या मुठीनें भाजलेल्या जमिनीवर बेतानें फेकून देतात. याप्रमाणें धान्य पेरल्यावर त्यावरून दोन बैली नांगर फिर-

वितात, म्हणजे जमिनीवर पेरलेला दाणा मातींत झांकला जातो. मावळ व कोंकण प्रांतांतील पेरणीची बहुतेक तऱ्हा अशीच आहे.

देशांतील पेरणीची तऱ्हा वरच्यापेक्षां वेगळी आहे. देशांतील भागांत खरीप व रबी ह्या दोन्ही हंगामाचीं पिकें करतात. खरिपाचा हंगाम रोहिणी नक्षत्रापासून सुरू होतो. परंतु पर्जन्य पडूं लागल्याखेरीज मातींत दाणा टाकण्याचें धाडस सहसा कोणी करीत नाहीं. म्हणून एक दोन पाऊस पडून चार सहा बोटें जमिनीस ओल पोंचली म्हणजे प्रथम मूग, उडीद, अरगडा ( हलक्या प्रतीचे जोंधळे ) ह्या धान्याची पेरणी करतात. त्याच्या मागून म्हणजे मृगाच्या अखेरीपासून पुनर्वसू नक्षत्र संपेपर्यंत बाजरीच्या पेरण्या चालतात. पाऊस पडून ओल चांगली झाल्यावर वापसा पाहून पेरणी होते, यामुळें आगें मागें महिना दोन महिने पेऱ्याचें काम चालतें. देशांतील सर्व भागांत हातानें धान्य पेरीत नाहींत. पेरणी पाभारीनें करतात.

पाभार कशी असतें हें शेतकऱ्यांस व त्यांच्या मुलांस चांगलें ठाऊक असतें. पाभारीच्या खालच्या अंगास लोखंडाच्या चार फाळ्या विती वितीच्या अंतरानें बसविल्या असतात. एका चार भोंकाच्या लांकडी चाड्याच्या खालच्या बाजूस बांबूच्या दोन अडीच हात लांब अशा नळ्या उभ्या बसविल्या असतात. त्यांतील एका नळीचें खालचें तोंड प्रत्येक फाळ्याच्या जरासें पाठीमागें जोडलेलें असतें. अशा तयार केलेल्या पाभारीच्या चाड्यांत मुठी मुठींनीं धान्य सोडूं लागून पाभारीस जुंपलेले बैल

हाकले म्हणजे फारोळ्यानीं जमीन दोन-तीन बोटें उकरली जाते. व त्या भेगेंतच नळीवाटे दाणे जमिनीवर पडत जातात. ह्या पाभारीच्या पेरणीनें धान्याच्या ओळी सरळ पडतात. अशा रीतीनें पाभारीनें धान्याची पेरणी झाली म्हणजे लागलीच पेरलेल्या जमिनीवर कुळव धरून राण्णी हाकतात. तेणेंकरून पेरलेल्या धान्यावर माती पडून जमीन सारखी होते. नंतर हळू हळू धान्याची उगवणी होत जाते.

बाजरीच्या शेतांत मटकी, हुलगे, पावटे व तूर हीं कडधान्यें व अंबाडी पेरण्याची चाल आहे. त्यास कठण म्हणतात. त्यापैकीं मटकी मात्र बाजरींत मिसळून पाभारीनें पेरतात. परंतु त्याखेरीज दुसरीं कडधान्यें निराळीं मोघावीं लागतात.

रबीच्या पिकाचा हंगाम पूर्वा नक्षत्र अर्धें झाल्यावर सुरू होतो, तो हस्त नक्षत्र संपे तोंवर चालतो. रबीचीं मुख्य धान्यें शाळू (जोंधळा) गहूं, हरभरा व कापूस हीं होत. शिवाय कर्डी, जवस व कांहीं कडधान्येंही शाळूंतच पेरण्याची चाल आहे. शाळू वगैरे सर्व धान्यांची पेरणी वर सांगितल्याप्रमाणें पाभारीनेंच करतात, व पोटधान्यें निराळीं मोघतात. बाकी सर्व रीत खरिपाच्या पिकाप्रमाणेंच समजावी.

धान्याची पेरणी होऊन त्यांचे मोड वीतभर उंच वाढले म्हणजे कोळपणी करतात. कोळप्याच्या खालच्या बाजूस दोन लांकडी दिंडें असतात. त्या दर दिंडास लोखंडी दोन दोन गोले बसविले असतात. कोळपणें सुरू होऊन बैल चालू लागले म्हणजे धान्याचे मोडांच्या

ओळीच्या मधून गोल्यानीं जमीन उकरली जाते, तेणें-करून गवत उगवलें असेल तें निघून येतें आणि मोडाचे बुडाशीं मातीचें पुरण पडतें. त्यामुळें शेतास चांगला धजाव येतो. कोळपण्याचें काम जपून करावें लागतें. नाहीं तर धान्याचे मोडास धक्का बसून शेताची खराबी होते. कोळपणीचें काम आटपल्यावर कापणीपर्यंत फारसें काम पडत नाहीं.

## शेतकऱ्यांची खरी ठेव.

आपल्या मुलाबाळांचें बरें व्हावें, आपल्या पाठीमागें त्यांचा चरितार्थ नीट चालावा व त्यानीं सुखानें नांदावें असें सर्व आईबापांस वाटत असतें. म्हणून सर्व लोक आपआपल्या समजुतीप्रमाणें व सामर्थ्यानुरूप तजवीज करून ठेवतात. कोणी द्रव्यसंचय करून ठेवतात, कोणी घरें बांधून ठेवतात, व कोणी अन्य मार्गानें कांहीं व्यवस्था करतात; परंतु त्यांच्या इच्छेप्रमाणें मुलांस त्या पदार्थांचा कितपत उपयोग होतो हें सर्वांस ठाऊकच आहे.

परमेश्वर सर्व मनुष्यांचा मायबाप आहे, व आपण सर्व त्याचीं लेंकरें आहों. त्याची कृपा सर्वांवर सारखी आहे. तेथें आवड निवड अगदीं नाहीं. त्याणें आपणाकरितां जी ठेव ठेवली आहे ती अगाध आहे. जो मनुष्य प्रामाणिकपणानें कष्ट करून पोटास मिळवितो त्याजवर भगवंताची दया फार असते, या नियमास अनुसरून परमेश्वराची शेतकऱ्यांवर मोठी कृपा आहे. त्यांच्याकरितां जी त्यानें ठेव ठेवली आहे ती फारच वर्णनीय होय. आपण आपल्या मुलां-

करितां जी ठेव ठेवतो ती क्षणभंगूर असते, म्हणून मुलें दुर्गुणी निघाल्यास तिचा गैर कामीं खर्च होऊन ती नाश पावते. शेतकऱ्यांची ठेव तशी नाहीं. तिचा नाश करतांच येत नाहीं व ती कोणास चोरतां येत नाहीं. शेतकऱ्यांचें ठेवणें उकरून पळविण्याचा कोणी यत्न केल्यास ती चोरांच्या हातीं न लागतां उलटी अधिकच वाढते. भगवंताच्या इच्छेप्रमाणें जो योग्य रीतीनें वागतो त्यास ती प्राप्त होते. इतरांस मिळत नाहीं. ही ठेव कमी होणारी नसून अखंड चालणारी आहे.

ही ठेव कोणती म्हणाल तर जमिनींतला पिकाऊपणा. ह्या ठेवीवर आज हजारों वर्षें कोटयावधि शेतकऱ्यांचा गुजारा होत आहे. तरी अजून ती बालाग्र कमी झाली नाहीं. आमच्या देशाप्रमाणें पृथ्वीचे पाठीवर दुसरे पुष्कळ देश आहेत. त्यांतील कितेकांची जमीन अगदीं खडकाळ व नापिक आहे. कोठें कोठें तर जमिनींत पेरलेलें बीं जरा मोड फुटून बाहेर पडतें तोंच थंडीचा कडका पडून सारें पीक करपून पार होतें. तेथें ऊन कसें तें पडतच नाहीं. जिकडे तिकडे जमिनीवर पाणी गोठून बर्फ होतें. अशा ठिकाणच्या शेतकऱ्यांची काय अवस्था होत असेल? सरकार धारा वारून ते पोटास काय खात असतील? परंतु चमत्कार हा कीं, अशा ठिकाणचे लोक केवळ आपल्या उद्योगानें फार सुखी व संपत्तीमान होऊन बसले आहेत.

आमच्या देशाची जमीन तशी नाहीं. ती फार सुपीक आहे, तींत अनेक प्रकारचीं धान्यें पिकण्याचें सामर्थ्य आहे. भगवंताचा आमच्या देशावर हा केवढा उपकार

आहे ? येथें भलत्या वेळीं थंडी पडत नाहीं, वर्फ पडून शेतें करपून जात नाहींत, असें असतां आमचे लोक इतके दरिद्री झाले हा दोष भगवंताकडे नाहीं, आमच्या कडेसच येतो. आमच्या शेतकऱ्यांस ज्ञान नाहीं हेंच त्यांच्या दरिद्राचें मुख्य कारण आहे. ते ज्ञानी झाले ह्मणजे त्यांचें दारिद्र्य नाहींसें होईल. त्यांचे हाल कमी होऊन सामर्थ्य वाढेल, व अशा क्रमानें वाढतां वाढतां ते ह्या ठेवीचा चांगला उपयोग करूं लागून सुखानें नांदूं लागतील; आणि मग ते परमेश्वराचे उपकार मानून त्याचें वारंवार नामस्मरण करतील.

## शेताची राखण व रक्षणाचे अन्य उपाय.

जमीन तयार करून शेताची पेरणी झाल्यावर धान्य उगवून तें वाढूं लागतें. जित्रब जसजसें वाढीस लागतें तसतशीं त्याच्या रक्षणाची शेतकऱ्यांस तजवीज करावी लागते. पेरलेल्या धान्याचे मोड उगवून पाला हिरवा दिसूं लागला म्हणजे गुरें ढोरें शेतांत शिरून तें तुडविण्याची व खाऊन टाकण्याची भीति असते. तिच्या निवारणार्थ शेतासभोंवती कुंपण घालण्याची चाल फार आहे. बाभळीच्या किंवा तसल्याच दुसऱ्या झाडांच्या कांट्या तोडून त्याची कुंपण घालतात. कांहीं लोक फड्या निवडुंगाची अगर गोल निवडुंगाची शेतासभोंवती बाड लावतात. त्यामुळें गुराढोरांस अथवा शेळ्या वगैरे पशुंस आंत शिरतां येत नाहीं. शिवाय शेतांतील रानाची बेणणी

वगैरे कामें करण्याकरितां शेतांत अनेक वेळ जावें लागतें, तेव्हां त्याची देखरेख करावी लागते.

जित्रब पोटऱ्यास येऊन निसवूं लागलें म्हणजे मग फार जपावें लागतें. कारण दाणा दुधास भरण्याच्या वेळीं पांखरांचा फार उपद्रव होतो, त्यावेळीं राखणेची हयगय केली तर पांखरें सगळ्या शेताचा फन्ना करतात. हें शेतकऱ्यांस चांगले कळत असल्यामुळें ते रात्रंदिवस शेतांत राहून राखण करतात. अशा वेळीं शेताच्या मध्यभागीं लांकडाचा उंच माळा बांधून त्यावर राखणदार बसतो, आणि हातांत गोफण घेऊन दगड मारतो किंवा गोफणीचे कोरडेच फटकारे वाजवितो. शिवाय जागोजाग उंच डांभे किंवा शेकाटे पुरून त्याच्या शेंड्यास घोंगडीचीं किंवा रंगी बेरंगी चिरगुटाचीं भावली करून तीं लोंबकळत ठेवतात. खेरीज माळ्याच्या उंचीपासून चारी बाजूंस दूर पर्यंत दोऱ्या नेऊन त्या दुसऱ्या उंच झाडांस बांधतात; तेणेंकरून माळ्यावरील राखणदारास आपण सावध असल्याचें चिन्ह चारी बाजूस एकदम दाखवितां येतें. माळ्यावरला राखणदार पांखरांचे थवे पाहून वारंवार आरोळ्या ठोकीतच असतो. अशा प्रकारचे अनेक उपाय व सोयी करून शेतकरी लोक पिकाचें रक्षण करतात. तेव्हां दाणा हातीं लागतो. दाणा चांगला भरून पक्क दशेस येई पर्यंत पक्ष्यांची भीति फार असते. पिकल्यावर तितकी राहत नाहीं. पण मग चोराची भीति. राखणदार गैरसावध बसला किंवा झोंपी गेला कीं चोरानीं डाव साधलाच. शेतकऱ्यानें बारा महिने थंडी, ऊन व पाऊस ह्यांत जिवापाड श्रम करून शेत उभें करावें, आणि तें

पसवल्यावर प्राणा पलीकडे जपून त्यास पिकवावें. अशा निदळच्या घामानें तयार केलेलें शेत अगदीं कापणीस आलें असतां जरा डोळा चुकला कीं, उभ्याच्या उभेंच चोरानीं न्यावें कापून! दुष्ट व चांडाळ लोकांनीं असा एखाद्याचा घात केला म्हणजे त्या बिचाऱ्यास काय वाटत असेल? अशा गोष्टी सर्वत्र घडतात असें नाहीं. तथापि 'गांव तिथें म्हारवडा.' या म्हणीप्रमाणें प्रत्येक गावांत दरसाल असलीं उदाहरणें थोडी फार घडतातच. यावरून जें धान्य आपण नेहेमी खातों, तें पिकविणाऱ्या शेतकऱ्यांस त्याच्या आरंभापासून शेवट पर्यंत किती, दगदग व काळजी वाहावी लागते, हें वाचणाऱ्यानीं नीट लक्षांत आणावें. आणि आपले अन्नदाते बिचारे शेतकरी हे फारच अज्ञानावस्थेंत राहिल्यामुळें त्यांस फार दुःख व दैन्य भोगावें लागत आहे, त्यांच्या परिहाराची कळकळ धरून त्यांस शहाणे व सुखी करण्याचा अल्पस्वल्प तरी प्रयत्न करावा, हें सर्वांस हात जोडून मागणें आहे.

## शेतकऱ्यांची कर्मणूक.

पृथ्वीच्या पाठीवर लहान मोठे असे अनेक प्रकारचे कोट्यावधि प्राणी आहेत. त्या सर्वांच्या अन्ना पाण्याची सोय भगवंतानें करून ठेविली आहे. पण मनुष्याचें मात्र तसें नाहीं. उन्हाळा, पावसाळा व हिंवाळा, ह्यांत निरनिराळ्या प्रकारची हवा असते. पण पशुपक्ष्यादि सर्व प्राण्यांस त्या त्या ऋतूंत माझें कसें होईल ही काळजी करावी लागत नाहीं. उन्हाळ्यांत उकडेल अगर पाव-

साळ्यांत मला कोरडी जागा कशी मिळेल हा विचार त्यांस कधींही करावा लागत नाहीं. त्यांची तजवीज देवानें त्यांच्या स्थितीनुरूप आधींच करून ठेविली आहे. पण मनुष्याचें प्रकरणच वेगळें. पावसाळा सुरू झाला नाहीं तोंच घरें शाकारणें, उबदार वस्त्रें तयार करून ठेवणें इत्यादि अनेक तजविजी त्यास आधीं कराव्या लागतात. नाहीं तर मग फार त्रेधा उडते. मनुष्यास देवानें इतरांपेक्षां ‘ बुद्धि ’ मात्र ज्यास्त दिली आहे. तिचा तो जों जों ज्यास्त उपयोग करूं लागतो तों तों त्याची योग्यता इतर प्राण्यापेक्षां फार श्रेष्ट होत जाते. परंतु असें होण्यास मनुष्याला फार श्रम करावे लागतात. साधारण पतीच्या निर्वाहासाठीं देखील त्यास अतोनात उद्योग करावा लागतो. सारांश उद्योग केल्यावांचून मनुष्यास खावयास मिळूंच नये असा ईश्वरी संकेत दिसतो.

उद्योग करणें हें मनुष्यास अवश्य आहे हें वर लिहिलें. पण उद्योगाबरोबरच दुसरी एक गोष्ट अवश्य येते. ती कोणती म्हणाल तर विश्रांती. उद्योग केल्यावांचून मनुष्याचा निर्वाह होत नाहीं. तसेंच उद्योगानंतर विश्रांती मिळाल्याशिवाय मनुष्यास समाधान वाटत नाहीं. उद्योग हा शब्द एक आहे. पण उद्योग करण्याचे प्रकार अनेक आहेत. माती वाहणाऱ्या बिगाऱ्यापासून तों राज्य करणाऱ्या राजापर्यंत सर्वजण उद्योग करतात. म्हणून त्या सर्वांस विश्रांती मिळावी लागते. परंतु भगवंताची योजना अशी कांहीं मौजेची आहे कीं, खरोखर श्रम झाल्यावांचून विश्रांतीला गोडीच येऊं नये. पांढरपेशे व सावकार वगैरे सुखी लोक सावलींत बसून मिजाशीचे

उद्योग करतात, पण खरी विश्रांती त्यांस मिळत नाहीं. शेतकरी लोक भर उन्हांत शेतकामें करतात तेव्हां त्यांस फार श्रम होतात खरे. पण काम आटपल्यावर भाकर खाण्याकरितां ते झाडाखालीं बसतात. तेव्हां त्या सावली-पासून त्यांस फार आनंद होतो. श्रमानें व उन्हानें आंग तापून घामानें थबथबत असतें, त्यामुळें सांवली खालीं येतांच त्यांस समाधान वाटतें. तितक्यांत एखादी वाऱ्याची बारीकशी झुळूक आली तर फारच बहार होते. तेथें आपली मीठ भाकर ते मोठ्या प्रेमानें खातात. त्या अन्नास जी गोडी असते ती त्रिभुवनांत दुसऱ्या कोठेंही नसेल. दुपारीं अशा सावलींत भाकर खाऊन व ओढ्याचें स्वच्छ पाणी पिऊन शेतकऱ्यांस जें समाधान व सुख होतें, त्याचा कोटयांश जलमंदिरांत बसून मिष्टान्न खाणाऱ्या राजपुत्रांसही होत नसेल. सारांश भगवंताची करणी अगाध आहे. असें नसतें तर शेतकरी व हलकीं कामें करणारे इतर लोक जगले सुद्धां नसते. पण देवास सर्वांची काळजी आहे. म्हणून त्याणें अनेक प्रकारांनीं सर्वांना सुख सारखें वाटून दिलें आहे.

विश्रांती घेण्याचा मुख्य उद्देश हा असतो कीं, श्रम केल्यावर मनुष्यास थकवा येतो, एकच काम फार वेळ केल्यानें कंटाळा येऊन मनावर बोजा दिल्यासारखें होतें. तें सर्व नाहींसें होऊन मनास तरतरी व प्रफुल्लितपणा यावा, आणि शरीर व मन ताजे तवाने होऊन पुनः काम करण्यास उत्साह व उमेद वाटावी. सावली खालीं कांहीं वेळ बसून शेतकऱ्यांस जी विश्रांती मिळते तिजपासून वरील उद्देश पूर्णपणें सिद्धीस जातो. रात्री आपण झोंप

घेतों तोही विश्रांतीचाच प्रकार. दिवसभर शेतांत खपून घरीं गेल्यावर शेतकऱ्यांनीं चवाळ्यावर अंग टाकलें कीं, लगेच त्यांस झोंप येते. ढेंकूण किंवा डांस चावणें, अगर स्वप्नें पडून झोंप मोड होणें, हें त्यांस ठाऊक सुद्धां नसतें. पण मऊ बिछान्यावर निजणाऱ्या सुखी लोकांच्या घरीं असल्या उपद्रवाचा रोज सुकाळ. यामुळें त्यांस गाढ निद्रेचें कौतुक फार वाटतें.

वर विश्रांतीचे दोन प्रकार सांगितले. पण ह्याखेरीज तिसरा एक प्रकार राहिला आहे. त्याचें नांव कर्मणूक ! हाच ह्या धड्याचा मुख्य विषय आहे. मनुष्यांच्या स्थितीप्रमाणें कर्मणुकीचे अनेक प्रकार आहेत. तरी त्या सर्वांचा हेतु एकच असतो. तो हा कीं, उद्योग केल्यानंतर दुसऱ्या एखाद्या नादांत चित्त एकाग्र होऊन गुंगून जावें, झालेल्या श्रमाचा क्षणभर विसर पडावा, आणि दुसऱ्या दिवसच्या कामास उमेद यावी.

संध्याकाळीं सर्वांचीं जेवणें झाल्यावर खेडेगांवांत तमाशे उभे राहातात. तेथें डफ तुंतुण्यावर लावण्या व पंवाडे म्हणतात. तेव्हां त्या तमासगिरांच्या भोंवती फार गर्दी जमते. तमाशा पाहण्यास बायका, पोरें व बापे सर्व जमतात. म्हातारीं माणसें सुद्धां घरीं राहात नाहींत. तें पाहून शहरच्या नवख्या मनुष्यास मोठी मौज वाटते. मध्यभागीं दोहीं बाजूला पलितें जळत असतात. त्यांजवळ तमासगीर उभे राहातात. व त्यांचे सभोंवती लोकांचा गराडा पडतो. त्या वेळेस सर्वांचीं मनें त्या लावण्याच्या भरांत अगदीं गुंगून गेलीं असतात. त्यास

दुसऱ्या कशाची आठवण नसते. अशा वेळीं गांवांत चोरी झाली तरी कोणास कळत नाहीं.

याशिवाय थंडीचे दिवसांत चावडीजवळ अगर दुसऱ्या कोठें उघड्या जाग्यांत मध्यभागीं उथळसा एक खड्डा खणतात. त्यांत संध्याकाळीं लांकडाचे ओंडे टाकून विस्तव पेटवितात. रात्रीं जेवणें झालीं म्हणजे सर्व मंडळी येऊन तेथें जमते, आणि त्या विस्तवाच्या भोंवती आपल्या घोंगड्या आंथरून शेकत बसते. मग एखादा म्हातारा पाटील अगर संभावित शेतकरी गोष्टी सांगण्यास आरंभ करतो. त्या गोष्टी बाकीचे सर्व लोक मोठ्या प्रेमानें व भक्तीनें चित्त देऊन ऐकतात. कांहीं वेळानें त्यांचें सर्व लक्ष पूर्णपणें गोष्टींकडेच लागतें. आणि सर्वांची चित्त-वृत्ति हळू हळू एकाग्र होऊन ते झोंपी जातात.

अशा वेळीं ज्या गोष्टी सांगतात त्या तुकाराम बुवा, ज्ञानोबा, अशा साधूंच्या किंवा दुसऱ्या अनेक प्रकारच्या असतात, तेथें कधीं मधीं या पुस्तकासारखें एखादें पुस्तक वाचण्याचा क्रम सुरू झाल्यास फार उपयोग होईल. शे-तकऱ्यांस कर्मणूक होऊन आपली खरी स्थिति काय आहे हें त्यांस समजूं लागेल. आपल्या अडचणी दूर करण्यास कोण कोणते उपाय करावे हें त्यांच्या मनांत घोळूं लागेल. अशा गोष्टींत त्यांचें चित्त एकाग्र होऊन ते झोपी जातील. पण पहाटेस उठून ह्याप्रमाणें वागतील, व अशा रीतीनें कांहीं दिवस क्रम चालला तर देवाच्या दयेनें ते हळू हळू शहाणे व सुखी होत जातील असा भरंवसा आहे.

# शेताची कापणी व मळणी.

सराईच्या वेळीं धान्याचीं शेतें पिकून तयार झालीं म्हणजे पिकें काढतात. त्यास काढणी किंवा कापणी म्हणतात. मावळचीं व कोकणचीं सर्व धान्यें जमिनी बरोबर विळ्यानें कापून जेथल्या तेथेंच जराशीं पसरून ठेवतात. तेणेंकरून उन्हाच्या तापीनें चांगलीं हडकलीं ह्मणजे दुसरे दिवशीं त्याच्या पेंढ्या बांधून भाऱ्याभाऱ्यांनीं नेतात, तेथें गांवाशेजारीं लांकडाच्या माचोळीवर किंवा झाडाच्या बेळक्यांत शेंडे आंत व बुडखे बाहेर करून रचून ठेवतात. त्यास अडवी ह्मणतात. कामकाज आटपून शेतकरी मोकळे झाले ह्मणजे झोडण्या व मळण्या सुरू होतात. हें काम खळ्यावर किंवा घरांशेजारीं आंगण्यांत करितात. तेथली जमीन खणून व पाणी टाकून चांगली चोपतात. ती वाळल्यावर शेणानें सारवून स्वच्छ करतात. नंतर मध्यभागीं लांकडाची बरीच लांब रुंद व खूब जाडी अशी फळी ठेवून तिजवर भाताची पेंढी झोडली म्हणजे दाणे खालीं गळून पडतात. अशा प्रकारें सगळी अडवी झोडल्यावर त्यांतील केरकचरा व भूस उडविण्याकरितां उंच घडवंचीवर उभें राहून उपणलें ह्मणजे भात तयार होतें. तें उखळांत घालून सडलें म्हणजे तांदूळ होतात. नाचणी, वरी, सांवे, व हरीक हीं धान्यें झोडीत नाहींत. त्यांची मळणी करतात. खळ्याच्या मध्यभागीं एक खांब पुरतात त्यास तिवडा ह्मणतात. त्या सभोंवती कापून आणलेलीं वरकड धान्यें पसरून टाकतात. आणि मग तिवड्यास बांधलेले बैल सभोंवती फिरवितात, म्हणजे त्यांच्या पायांनीं

कणसें तुडवलीं जाऊन दाणे सुटून पडतात. ते उपण-ले म्हणजे झालें. अशा प्रकारें झोडलेल्या किंवा मळणी काढलेल्या धान्याच्या ढिगास रास ह्मणतात. राशीवर धान्य मोजून काढल्यावर मग घरीं किंवा बाजारांत वगैरे न्यावयाचें असेल तिकडे नेतात. याप्रमाणें कोंकणच्या व मावळच्या कापणीची व मळणीची रीति आहे.

आतां देशांतील रीति कशी आहे ती पाहूं. तेथल्या धान्यापैकीं बाजरी, अरगडी, व तूर हीं धान्यें भुई बराबर कापतात. आणि बाकीचीं सर्व धान्यें उपटून काढतात. ह्या कामास काढणी म्हणतात. बाजरी, जोंधळा, गहूं, व खपले ह्यांच्या पेंढ्या बांधतात. व बाकी सर्व प्रकारच्या कडधान्याचे कडपे करून ठेवतात. ते खळ्यावर वाहून नेल्यावर बाजरी व जोंधळे ह्यांच्या पेंढ्यांचीं कणसें आंतल्या अंगास व बुडखे बाहेरचे बाजूस, याप्रमाणें गोल रचतात त्यास सुडी म्हणतात. व इतर सर्व धान्याचे कडपेच रचून ठेवतात. फुरसत सांपडली म्हणजे मळणीस आरंभ होतो. देशामध्यें हीं कामें खळ्यावरच करतात. बाजरीचीं व जोंधळ्याचीं कणसें मोडून काढतात. त्यास मोडणी म्हणतात. खपले व तूर झोडतात. आणि बाकीचीं सर्व धान्यें मोडल्याखेरीज जशाच्या तशींच खळ्यांत तिवड्या सभोंवती पसरतात. मग बैल तिवड्यास जुंपून सभोंवती फिरवले म्हणजे खळ्यांत जें धान्य टाकलें असेल त्याचे दाणे सुटून पडतात. ते उपणून रास झाली म्हणजे मोजून तें डोक्यावर, बैलावर, किंवा गाडींत घालून न्यावयाचे असेल तिकडे वाहून नेतात.

भाताच्या वैरणीस पेंढा, बाजरीच्या वैरणीस सरमड,

व जोंधळ्याच्या वैरणीस कडबा, असें म्हणतात. व तुरी शिवाय करून वरकड सर्व धान्याचे मळणीचें भूस होतें. ही सर्व वैरण गुरें खातात. त्या पैकीं कडब्यास किंमत ज्यास्त पडते. तुरीच्या तुराट्या निघतात, त्या पाण्यांत भिजवून नरम झाल्यावर त्याच्या पांट्या करतात, केर झाडण्यास खराटे करतात, व सरपणास जाळूनही टाकतात.

## शेतकऱ्यांच्या शाळा.

मनुष्यास विद्या मिळाली म्हणजे तो मनाचा थोर होतो, व त्याचा समज वाढतो. ही गोष्ट मनांत आणून आमच्या इंग्रज सरकारानें देशभर शाळा घातल्या आहेत, त्यामुळें आमच्या देशांत बरेच विद्वान लोक तयार झाले, परंतु सरकारी शिक्षणपद्धतींत कांहीं तरी मोठी चूक आहे असें पुष्कळ लोकांस आलीकडे वाटूं लागलें आहे. व्यवहारांत वागतांना मनुष्यास हजारों गोष्टी कराव्या लागतात, त्या सुलभ रीतीनें कशा कराव्या हें विद्यार्थ्यांस पूर्णपणें समजावें. हाच शिक्षण देण्याचा मुख्य उद्देश आहे. ज्या शिक्षणक्रमानें हा उद्देश सिद्धीस जात नाहीं तो शिक्षणक्रम व्यवहारांत गैर उपयोगाचा असें म्हणणें भाग पडतें. हल्लीं सरकारी शाळांतून जें शिक्षण मिळतें त्याचा उपयोग इतर लोकांस काय होतो याचा विचार येथें करणें नाहीं, परंतु शेतकऱ्यांच्या स्थितीचा विचार करून पाहिला म्हणजे या शिक्षणाचा त्यांस व्हावा तसा उपयोग होत नाहीं असें म्हणणें भाग पडतें.

आपल्या देशांत इतर लोकांपेक्षां शेतकऱ्यांचा वर्ग

फार मोठा आहे, सबब त्यांचे शिक्षणाचा विचार करून योग्य व्यवस्था करण्याचा यत्न करणें हें काम अत्यंत महत्वाचें आहे. सध्यां खेडेगांवांतून शेतकऱ्यांकरितां ज्या शाळा आहेत त्या कशा असाव्या, त्यांत कोणते विषय शिकवावे, एकंदर व्यवस्था कशी असावी व शिक्षणक्रम कसा असावा याचें थोडेसें दिक्दर्शन करूं.

एखादा पदार्थ तयार करतांना आरंभापासूनच तसा रोंख असला म्हणजे फार उपयोग होतो. ही गोष्ट सर्व कारागिरांस चांगली ठाऊक असते. त्याचप्रमाणें या शाळांतले विद्यार्थी उत्तम प्रकारचे वाकब शेतकरी बनावे हा उद्देश पूर्णपणें ध्यानांत ठेवला पाहिजे. व लहान मुलांस शिक्षण देतांना आरंभापासूनच तसा रोंख ठेवणें हें अत्यंत इष्ट आहे. हल्लीं सरकारी शाळा एकाद्या पडक्या देवळांत किंवा भिकार धर्मशाळेंत असतात. तसें न करितां केवळ शाळांकरितां स्वतंत्र इमारती बांधलेल्या असाव्या. शिक्षणाकरितांच शाळेला जोडलेली अशी चार पांच एकर जमीन असावी. व तिचा कांहीं भाग मुलांस खेळण्याकरितां खुला राखलेला असावा. शाळेची एकंदर व्यवस्था अशी असावी कीं, तिचे योगानें मुलाचें मन घरच्या खेळांकडे न धांवतां शाळेंत येणेंच प्रिय असें त्यास वाटूं लागावें. याशिवाय शाळेंत इतर कोणत्या गोष्टी असाव्या त्या लिहिण्याचे पूर्वीं शिक्षणक्रमास आरंभ कसा करावा व तो क्रम पुढें कसा चालवावा याचा विचार करूं.

निरनिराळ्या पदार्थांचीं चित्रें पाहण्याचीं लहान मुलांस फार हौस असते. प्रथम मुलगा शाळेंत आला म्हणजे

त्यास हीं चित्रें दाखविण्यापासून आरंभ करावा. शेतकामास जीं विखणें व साहित्य लागतें त्याचींही चित्रें असावीं, म्हणजे ओळखीचे पदार्थ पाहून मुलाचें मन तिकडे वळतें. या निरनिराळ्या पदार्थांचीं नांवें काय, उपयोग काय, हें त्यांस तोंडानें समजून सांगावें. मधून मधून त्यांस मुळाक्षरांचीं नांवेंच सांगावीं. कधीं त्यांचे आकारच काढून दाखवावे. अशी हळू हळू त्यांस विद्येची चटक लावावी, परंतु त्यांच्या मनावर बोजा पडल्यासारखें होऊं देऊं नये, त्यांची वृत्ति नेहेमी आनंदीत राखावी. त्यांच्या क्रमिक पुस्तकांतील धडेही फक्त ओळखीच्या पदार्थांविषयींच असावे. सारांश सर्व रीतीनीं त्यांचें मन शेतकामाकडे वळवावें.

पुढें साधारण लिहिणें, वाचणें व तोंडचे हिशेब वगैरे त्यांस बरेच समजूं लागल्यानंतर साक्षात शेतकामाकडे त्यांची योजना करावी. शाळेस जोडलेल्या जमिनींत नांगरणें, पेरणें, कापणें, व मळणें वगैरे शेतकामास अवश्य लागणाऱ्या सर्व गोष्टी चालू असाव्या. तें काम वेळोवेळीं विद्यार्थ्यांस दाखवावें. नंतर कांहीं दिवस दुसऱ्यांबरोबर तें काम शिकवावें. व शेवटीं तीं सर्व कामें त्यांच्या हातून करवावीं. हें काम हातानें चांगलें करतां येऊं लागल्यावर शेतकामाचीं विखणें कशीं असावीं, त्यांचा आकार कसा असावा, शेतकाम करतांना कोणत्या गोष्टीकडे विशेष लक्ष द्यावें लागतें, ही सर्व माहिती हळू हळू त्यांस शिकवावी. सारांश क्रमाक्रमानें असें शिक्षण दिल्यास विद्यार्थ्यांची वृत्ति याच विषयाकडे वळेल. शाळा सोडल्यानंतर त्यांचे विचार जसजसे पक्क होतील तसतसा आपल्या कामांत तो निपूण

होईल, व उत्तरोत्तर तो संपत्तिमान व सुखी होईल यांत संशय नाहीं.

वरील मजकूर वाचून आमचा हा लेख मनोराज्यासारखा आहे असें कित्येकांस वाटेल, परंतु थोडा विचार केल्यावर तसें वाटणार नाहीं. ही गोष्ट करणें रयतेस जड जाईल, पण सरकारास तसें होणार नाहीं. सन १८५८ सालच्या राणी सरकारच्या जाहिरनाम्यांत 'आमच्या रयतेची आबादी तेंच आमचें सामर्थ्य. त्यांचा संतोष तीच आमच्या राज्याची मजबुदी.' हें वाक्य लिहिलें आहे तें सर्वथां खरें आहे. देशाचे कल्याणाचा विचार करतांना त्यांतील मोठ्या समूहाचे हिताकडे लक्ष देणें अत्यंत अवश्यक असतें. आमच्या देशांतील लोकवस्तींत शेतकऱ्यांचा वर्ग फार मोठा आहे, व ही गोष्ट त्यांचे कल्याणाची आहे. म्हणून इतर गोष्टी करण्यापेक्षां असल्या शाळा अगोदर स्थापन करणें हें सरकारचें पहिलें कर्तव्य आहे, व आमच्या या देशाच्या खऱ्या हिताची वृद्धि याच मार्गानें होण्याचा फार संभव आहे.

लार्ड रिपन साहेबानीं जें एज्युकेशनल कमिशन नेमलें आहे त्याणीं ही गोष्ट फार ध्यानांत धरली पाहिजे. असें केल्यानें खर्च वाढण्याची भीति आहे खरी, परंतु यापासून जें देशाचें हित होईल त्याची किंमत ह्या खर्चाच्या शेंकडो पटीहून ज्यास्त होईल. हल्लीं खेड्यापाड्यांतून ज्या शाळा आहेत तशा शेंकडो शाळा चालविण्यापेक्षां असली एकादीच ठेवणें हें अधिक श्रेयस्कर आहे. इकडे सरकार लक्ष देऊन योग्य तजवीज करील अशी पूर्ण आशा आहे. याशिवाय आमच्या देशांत बडोदें, हैदराबाद, इंदूर, ग्वाल्हेर, जयपूर इत्यादि

अनेक संस्थानें आहेत, त्यांणींही इकडे नजर फेंकावी अशी आमची त्यांस विनंती आहे. अशा शाळांची स्थापना केल्यापासून त्यांचें व रयतेचें किती हित होईल हें तोंडानें सांगतां येणें कठीण आहे, परंतु असली एकादी शाळा स्थापन करून पाहिल्यास थोड्याच दिवसांनीं फळ दृष्टीस पडूं लागेल. या कामाची खरी योग्यता इंग्रज सरकारास व आमचे संस्थानिकांस समजून ते योग्य तजवीज करतील तर थोड्याच दिवसांनीं देशाचें मायपोट जे शेतकरी त्यांची घसरलेली स्थिति सावरेल, ते उत्तरोत्तर सुखी होत जातील, व होतां होतां भगवंताच्या दयेनें सर्व देशास चढती कळा लागून आमच्या देशाची नष्ट झालेली संपत्ति व अन्न इकडे पूर्ववत वास करूं लागेल.

## गुरेंढोरें.

शेतकीच्या कामास गुरांढोरांची फार गरज लागते. म्हणून शेतकऱ्यांनीं त्यांचा संग्रह करून तीं नीट रीतीनें पोसावीं. गाई व बैल हीं जनावरें देशांतील भागांत फार लोक पाळतात. म्हशी व रेडे हीं फार पाळीत नाहींत. कोंकणांत व मावळांत म्हशी आणि रेडे पाळण्याची चाल ज्यास्त आहे. कारण तिकडे पाऊस फार पडतो. आणि म्हशी व रेड्यांस कितीही पाऊस पडला तरी सोसतो, फार पावसानें त्यांस इजा होत नाहीं. यामुळें कोंकणांत व मावळांत ह्या जनावरांची संख्या ज्यास्त असते. शिवाय ह्या दोन्ही प्रांतांत भात शेती फार करतात, त्याची लावणी करण्यास गुडघ्या इतका चिखल

करून त्यांत भाताचे आंत्रे लावावे लागतात. अशा चिखलटींत नांगरण्याच्या कामास रेड्यांचा फार उपयोग होतो. चिखलांत नांगरण्यास बैल फार थकतात. पण रेडे थकत नसून त्यांच्या पायलांनीं चिखल फार चांगला होतो. म्हणून रेड्यांचे पालण पोषणास तिकडचे लोक फार जपतात. हें जनावर बैलासारखें सुडसुडीत नसून फार मंद व जड असतें. तथापि त्याचा उपयोग फार चांगला होत असल्यामुळें मावळांत व कोंकणांत शेतकरी लोक त्याचा चांगला प्रतिपाळ करतात.

देशांत रेडे पाळण्याची चाल कमी. फार करून बैलच पाळण्याची चाल पुष्कळ आढळते. शेतकी जशी थोडी किंवा फार असते त्या मानानें बैल अधिक उणे पाळावे लागतात. शेतकीचे कामास बैलांचें फार साह्य लागतें. त्यांच्या खेरीज शेतकीचें काम चालत नाहीं. म्हणून शेतकरी लोक बैल पाळून त्यांचें मोठ्या काळजीनें रक्षण करतात. ह्यांच्या नरास बैल व स्त्री जातीस गाय ह्मणतात. गाय चार पांच वर्षांची झाल्यावर फळते, आणि गाभण राहिल्यावर नऊ महिन्यांनीं विते. तिला नर झाल्यास त्याला गोऱ्हा म्हणतात, व स्त्री जाती प्रसवल्यास तिला कालवड म्हणतात. गोऱ्हा चार पांच वर्षांचा झाल्यावर शेत कामास लावतात. प्रथम त्याला कुळवास किंवा हलक्या सलक्या कामास जोडतात. तेथें कांहीं दिवस कामांत घटावून वळण लागल्यावर मग नांगरास जुंपतात. नांगरणीचें काम जड असतें, म्हणून पहिल्या प्रथमच बैल नांगरास जोडीत नाहींत. बैल हाडापिंडानें मोठाड, व जिवट निपजणें हें बीजावर असतें.

म्हणून गाईस बैल देणें तो चांगला निकोप, मोठा व खबरदार असा पाहून द्यावा. म्हणजे त्यापासून पुढें चांगली संतति निपजते. बैल मोटेस व गाडीसही जोडतात.

गाय व्याल्यावर दूध देते. दुधाचा रंग पांढरा असतो. तें गोड, पौष्टिक, व बलवर्धक असल्यामुळें दूध पिण्याचा लोकांत संप्रदाय आहे. दूध तापवून निवाल्यावर त्यांत थोडें ताक मिसळलें म्हणजे तें विरजतें, आणि त्याचें घट्ट व आंबट असें दहीं बनतें. दहीं एक दोन दिवस आंबल्यावर तें मोठ्या भांड्यांत घालतात, आणि त्यांत पाणी घालून लांकडाच्या रवीनें खूब घुसळतात. म्हणजे त्याचें पातळ ताक होऊन घट्ट लोणी वर येतें तें काढून घेतात. लोणी कढवलें म्हणजे त्याचें तूप होतें. तूप चार पांच महिने राहिलें तरी नासत नाहीं. दूध, दहीं, ताक, व तूप हे पदार्थ आमचे लोक भोजनात खातात. गोरसाचा स्वतंत्र व्यापार गवळी लोक करतात. ज्याचे घरीं दुभतीं गुरें असतात त्यांस दुधापासून फायदा होतो.

गाईपेक्षां म्हैस फार दूध देते. एका गाईचें अच्छेरापासून फार तर दोन तीन शेर दूध निघतें, पण एक एक म्हैस आठ दहा शेर देखील दूध देणारी असते. म्हणून दुभत्याचा व्यापार करणारे गवळी व धनगर लोक म्हशी फार पाळतात. दुभत्याची गरज नाहीं असे लोक आमच्या देशांत फार विरळा. ऐपतीप्रमाणें दुभत्यापैकीं कोणत्या तरी पदार्थांची अधिक उणी गरज सर्वांस लागतेच. आमच्याकडे तान्ह्या मुलांस दूध पाजण्याची फार चाल आहे. दूध आटिवलें म्हणजे त्याचा घट्ट खवा बनतो. त्यांत साखर मिळवली म्हणजे पेढे, बर्फी, इत्यादि

मिठाईचे पौष्टिक पदार्थ होतात. म्हणून गरिबांपासून तों मोठ्या श्रीमंतांपर्यंत सर्वांस गोरस प्रिय आहे. याकरितां त्याचें सर्व लोक मोठ्या आनंदानें सेवन करून समाधान पावतात.

गुरांचें शेण व मूत ह्यांचें शेतास खत होतें. शेणाच्या गोवऱ्या वाळवून सरपणास जाळतात. घरांतील व बाहेरील भुया शेणानेंच सारिवतात. अशा रीतीनें गुरांच्या मलमूत्राचा उपयोग फार होतो. आमचे शेतकरी खताचे कामास शेणाचा उपयोग करतात. परंतु मुत्राचा उपयोग करीत नसल्यामुळें तें सगळें वांया जातें. त्याचा उपयोग खताचे कामीं करून घेण्याची लोकांनीं तजवीज केल्यास फायदाच होईल. म्हणून अशी तजवीज करावी कीं, गुरें बांधण्याची जागा चोपून साफ करावी, आणि गुरांच्या पाठीमागल्या बाजूस ती उतरती ठेवावी. व त्याच्या पलीकडे आडवा लहानसा पाट करून त्यांत मूत उतरेल असें करावें. अशा रीतीनें पाटांतील मूत गोठ्याच्या बाहेर खोल खळी काढून तो पाट खळग्यांत सोडावा. म्हणजे तेथें मूत्राचा संचय होईल. त्या खळींत दररोज थोडथोडी माती टाकीत जावी, म्हणजे घाण न सुटतां आयतें खत तयार होत जाईल. अशा प्रकारें खत तयार करण्याची चाल विलायतेकडे हल्लीं सुरू आहे.

याप्रमाणें गुरांचा अनेक प्रकारानीं आपणास उपयोग आहे म्हणून त्यांचें पोषण चांगल्या प्रकारें करून वृद्धि करावी. हयगयीनें किंवा अन्य रीतीनें त्यांचा नाश करूं नये.

## सरकार आणि रयत.

शरीर आणि प्राण ह्यांचा जसा निकट संबंध आहे, त्याच प्रमाणें सरकारची रयतेशीं जडणी आहे, म्हणून ह्यांतून कोणास जरी पिडा झाली तरी त्याचा परिणाम दोघांवर सारखा घडतो. रयत मूर्ख व दरिद्री झाली तर सरकारास कर मिळेनासा होतो. व सरकार किंवा त्याचे अधिकारी बेफाम होऊन मनःपूत वागूं लागले तर रयतेचा छळ होऊन ती नागवली जाते. शरीराच्या कोणत्याही भागास दुःख झालें तरी सर्वांगास वेदना होतात. त्याप्रमाणें सरकार आणि रयत ह्या व्यक्ति भिन्न दिसतात, तरी त्यांचा जीव एक आहे. म्हणून उभयतांनीं योग्य नियमानीं चांगलें वागून एकमेकांचें कल्याण चिंतावें हेंच योग्य आहे.

खेडेगांवच्या लोकांस सरकार म्हणजे मोठा बाऊ वाटतो. परंतु वास्तविक तसें नाहीं. आपण कुटुंबांत शहाणा व पोक्त मनुष्य पाहून त्याजवर सगळा कारभार टाकतों, आणि तो सांगेल तसें सर्वजण वागतों. अथवा आपल्या गांवचा सर्व कारभार पाटलाकडे देऊन त्याच्या हुकमांत सगळे गांवकरी वागतात. त्याच प्रमाणें सरकारच्या मोठ्या सत्तेची गोष्ट आहे. देशांतील मोठ्या लोक समुदायाचें नीट रीतीनें रक्षण व्हावें त्यांच्या जिवास व मालमत्तेस कोणी उपद्रव देऊं लागल्यास त्याचें न्यायानें शासन करावें. सर्व लोकांच्या कल्याणाच्या व हिताच्या अशा अनेक गोष्टी करून सर्व लोकांचें पुत्रवत पालन करावें अशा हेतूनें सगळ्या रयतेमें जो मोठा अधिकारी

मानलेला असतो त्यास राजा किंवा सरकार असें म्हणतात. रयतेकरितां वरील सर्व गोष्टी करण्यास खर्च फार लागतो, तो भागविण्यासाठीं निरनिराळ्या प्रकारानीं रयते पासून सरकार कर घेतें. व त्याच्या मोबदला अनेक प्रकारचीं सुखें व व्यवहाराच्या सोयी रयतेस सरकार देतें. कोणा-कडे कराची बाकी थकल्यास रयतेस तगादा करून सर-कारी अधिकारी ती वसूल करतात. त्याच प्रमाणें सर-काराकडून रयतेस ज्या गोष्टी मिळणें अवश्य आहेत त्या मागणें हा रयतेचा हक्क आहे.

शेतकऱ्यांपासून लोकल फंडाचा सरकार वसूल करतें त्याच्या मोबदला शेतकऱ्यांस विद्या देणें हें कर्तव्य आहे; ती जेथें मिळत नसेल तेथल्या लोकांनीं स्वस्थ न बसतां आपल्या येण्याचा सरकारापासून वसूल करून घ्यावा. त्याप्रमाणेंच अशा कामांत जे दोष किंवा न्यूनता दिस-तील तर त्याही दुरुस्त करून घ्याव्या. मागितल्याखेरीज मिळत नाहीं, व तगाद्या खेरीज वसूल होत नाहीं. ही गोष्ट पक्की ध्यानांत धरून आपल्यास पाहिजे असेल तें योग्य रीतीनें मागावें म्हणजे कांहीं तरी मिळतें. हा नि-यम सर्वांनीं ध्यानांत ठेवावा.

## गुराखी.

शेतकऱ्यांचीं मुलें सकाळीं न्याहारी केल्यावर आपआ-पल्या भाकरी घेऊन तयार होतात; आणि गुरेंढोरें सोडून त्यांस रानांत चारावयास नेतात. गांवचीं गुरें एकत्र जमून चरूं लागलीं म्हणजे गुराख्यांस फुरसत सांपडते. तितक्या

वेळांत ते एके ठिकाणीं जमून अनेक प्रकारचे खेळ खेळतात. कोणी अलगुजें वाजवितो, कोणी डोहो घालतो, कोणी दुसऱ्या ठिकाणच्या गुराख्यांस इशारा देण्याकरितां अनेक प्रकारच्या आरोळ्या मारतो, अथवा सगळे गुराखी मिळून हुतुतू, किंवा दुसरे खेळ खेळतात. गुराखी एकमेकांवर फार ममता करतात. दुपारच्या वेळेस आजुबाजूस पाण्याच्या ठिकाणीं गुरें पाणी पिऊन विश्रांति करितां गोठणीवर रवंत करीत बसलीं म्हणजे गुराखी जेवणाच्या तयारीस लागतात. जवळच एकादें गार सावलीचें झाड पाहून त्याखालीं जमतात, आणि आपआपल्या सिदोऱ्या उघडून जेऊं लागतात. भाकरीच्या कोरडेशाकरितां कोणी कांदे, कोणी चटणी, कोणी भाजी, कोणी अळण इत्यादि पदार्थ आणतात. त्यांतले एकमेकांस थोडथोडे देऊन सर्वजण मोठ्या आनंदानें मिटक्या मारीत खातात. ताहान लागल्यास ओंजळीनें स्वच्छ पाणी पिऊन तृप्त होतात. गुरांमागें धांवण्याचे श्रम, रानांतली मोकळी हवा, व निर्मल उदक, त्यांस नेहेमीं मिळतें. तेणेंकरून चटणी भाकर खाऊन जें त्यांस सुख व संतोष होतो तो शहरांत मोठ्या मिजाशीनें राहणाऱ्या थोर लोकांस देखील प्राप्त होत नाहीं. गुराख्यांचा पोषाख फार साधा असतो. नेसण्यास लंगोटी किंवा चड्डी, कंबरेस काच्या, आंगांत बंडी, डोक्यास टोपी किंवा मुंडासें, आंगावर घोंगडी, पायांत वाहाणा किंवा जोडा, आणि हातांत काठी; येवढा काय तो पोषाख. कित्येकांस तर लंगोटी, पटकूर, व काठी, यांखेरीज कांहीं मिळत नाहीं, तथापि त्यांच्यामध्यें करामत मोठी असते.

मानलेला असतो त्यास राजा किंवा सरकार असें म्हणतात. रयतेकरितां वरील सर्व गोष्टी करण्यास खर्च फार लागतो, तो भागविण्यासाठीं निरनिराळ्या प्रकारानीं रयते पासून सरकार कर घेतें. व त्याच्या मोबदला अनेक प्रकारचीं सुखें व व्यवहाराच्या सोयी रयतेस सरकार देतें. कोणाकडे कराची बाकी थकल्यास रयतेस तगादा करून सरकारी अधिकारी ती वसूल करतात. त्याच प्रमाणें सरकाराकडून रयतेस ज्या गोष्टी मिळणें अवश्य आहेत त्या मागणें हा रयतेचा हक्क आहे.

शेतकऱ्यांपासून लोकल फंडाचा सरकार वसूल करतें त्याच्या मोबदला शेतकऱ्यांस विद्या देणें हें कर्तव्य आहे; ती जेथें मिळत नसेल तेथल्या लोकांनीं स्वस्थ न बसतां आपल्या येण्याचा सरकारापासून वसूल करून घ्यावा. त्याप्रमाणेंच अशा कामांत जे दोष किंवा न्यूनता दिसतील तर त्याही दुरुस्त करून घ्याव्या. मागितल्याखेरीज मिळत नाहीं, व तगाद्या खेरीज वसूल होत नाहीं. ही गोष्ट पक्की ध्यानांत धरून आपल्यास पाहिजे असेल तें योग्य रीतीनें मागावें म्हणजे कांहीं तरी मिळतें. हा नियम सर्वांनीं ध्यानांत ठेवावा.

## गुराखी.

शेतकऱ्यांचीं मुलें सकाळीं न्याहारी केल्यावर आपआपल्या भाकरी घेऊन तयार होतात; आणि गुरेंढोरें सोडून त्यांस रानांत चारावयास नेतात. गांवचीं गुरें एकत्र जमून चरूं लागलीं म्हणजे गुराख्यांस फुरसत सांपडते. तितक्या

वेळांत ते एके ठिकाणीं जमून अनेक प्रकारचे खेळ खेळतात. कोणी अलगुजें वाजवितो, कोणी डोहो घालतो, कोणी दुसऱ्या ठिकाणच्या गुराख्यांस इशारा देण्याकरितां अनेक प्रकारच्या आरोळ्या मारतो, अथवा सगळे गुराखी मिळून हुतुतू, किंवा दुसरे खेळ खेळतात. गुराखी एकमेकांवर फार ममता करतात. दुपारच्या वेळेस आजुबाजूस पाण्याच्या ठिकाणीं गुरें पाणी पिऊन विश्रांति करितां गोठणीवर रंवत करीत बसलीं म्हणजे गुराखी जेवणाच्या तयारीस लागतात. जवळच एकादें गार सावलीचें झाड पाहून त्याखालीं जमतात, आणि आपआपल्या सिदोऱ्या उघडून जेऊं लागतात. भाकरीच्या कोरडेशाकरितां कोणी कांदे, कोणी चटणी, कोणी भाजी, कोणी अळण इत्यादि पदार्थ आणतात. त्यांतले एकमेकांस थोडथोडे देऊन सर्वजण मोठया आनंदानें मिटक्या मारीत खातात. ताहान लागल्यास ओंजळीनें स्वच्छ पाणी पिऊन तृप्त होतात. गुरांमागें धांवण्याचे श्रम, रानांतली मोकळी हवा, व निर्मल उदक, त्यांस नेहेमीं मिळतें. तेणेंकरून चटणी भाकर खाऊन जें त्यांस सुख व संतोष होतो तो शहरांत मोठया मिजाशीनें राहणाऱ्या थोर लोकांस देखील प्राप्त होत नाहीं. गुराख्यांचा पोषाख फार साधा असतो. नेसण्यास लंगोटी किंवा चड्डी, कंबरेस काच्या, आंगांत बंडी, डोक्यास टोपी किंवा मुंडासें, आंगावर घोंगडी, पायांत वाहाणा किंवा जोडा, आणि हातांत काठी; येवढा काय तो पोषाख. कित्येकांस तर लंगोटी, पटकूर, व काठी, यांखेरीज कांहीं मिळत नाहीं, तथापि त्यांच्यामध्यें करामत मोठी असते.

मानलेला असतो त्यास राजा किंवा सरकार असें म्हणतात. रयतेकरितां वरील सर्व गोष्टी करण्यास खर्च फार लागतो, तो भागविण्यासाठीं निरनिराळ्या प्रकारानीं रयते पासून सरकार कर घेतें. व त्याच्या मोबदला अनेक प्रकारचीं सुखें व व्यवहाराच्या सोयी रयतेस सरकार देतें. कोणाकडे कराची बाकी थकल्यास रयतेस तगादा करून सरकारी अधिकारी ती वसूल करतात. त्याच प्रमाणें सरकाराकडून रयतेस ज्या गोष्टी मिळणें अवश्य आहेत त्या मागणें हा रयतेचा हक्क आहे.

शेतकऱ्यांपासून लोकल फंडाचा सरकार वसूल करतें त्याच्या मोबदला शेतकऱ्यांस विद्या देणें हें कर्तव्य आहे; ती जेथें मिळत नसेल तेथल्या लोकांनीं स्वस्थ न बसतां आपल्या येण्याचा सरकारापासून वसूल करून घ्यावा. त्याप्रमाणेंच अशा कामांत जे दोष किंवा न्यूनता दिसतील तर त्याही दुरुस्त करून घ्याव्या. मागितल्याखेरीज मिळत नाहीं, व तगाद्या खेरीज वसूल होत नाहीं. ही गोष्ट पक्की ध्यानांत धरून आपल्यास पाहिजे असेल तें योग्य रीतीनें मागावें म्हणजे कांहीं तरी मिळतें. हा नियम सर्वांनीं ध्यानांत ठेवावा.

## गुराखी.

शेतकऱ्यांचीं मुलें सकाळीं न्याहारी केल्यावर आपआपल्या भाकरी घेऊन तयार होतात; आणि गुरेंढोरें सोडून त्यांस रानांत चारावयास नेतात. गांवचीं गुरें एकत्र जमून चरूं लागलीं म्हणजे गुराख्यांस फुरसत सांपडते. तितक्या

वेळांत ते एके ठिकाणीं जमून अनेक प्रकारचे खेळ खेळतात. कोणी अलगुजें वाजवितो, कोणी डोहो घालतो, कोणी दुसऱ्या ठिकाणच्या गुराख्यांस इशारा देण्याकरितां अनेक प्रकारच्या आरोळ्या मारतो, अथवा सगळे गुराखी मिळून हुतुतू, किंवा दुसरे खेळ खेळतात. गुराखी एकमेकांवर फार ममता करतात. दुपारच्या वेळेस आजुबाजूस पाण्याच्या ठिकाणीं गुरें पाणी पिऊन विश्रांति करितां गोठणीवर रंवत करीत बसलीं म्हणजे गुराखी जेवणाच्या तयारीस लागतात. जवळच एकादें गार सावलीचें झाड पाहून त्याखालीं जमतात, आणि आपआपल्या सिदोऱ्या उघडून जेऊं लागतात. भाकरीच्या कोरडेशाकरितां कोणी कांदे, कोणी चटणी, कोणी भाजी, कोणी अळण इत्यादि पदार्थ आणतात. त्यांतले एकमेकांस थोडथोडे देऊन सर्वजण मोठ्या आनंदानें मिटक्या मारीत खातात. ताहान लागल्यास ओंजळीनें स्वच्छ पाणी पिऊन तृप्त होतात. गुरांमागें धांवण्याचे श्रम, रानांतली मोकळी हवा, व निर्मल उदक, त्यांस नेहेमीं मिळतें. तेणेंकरून चटणी भाकर खाऊन जें त्यांस सुख व संतोष होतो तो शहरांत मोठ्या मिजाशीनें राहणाऱ्या थोर लोकांस देखील प्राप्त होत नाहीं. गुराख्यांचा पोषाख फार साधा असतो. नेसण्यास लंगोटी किंवा चड्डी, कंबरेस काच्या, आंगांत बंडी, डोक्यास टोपी किंवा मुंडासें, आंगावर घोंगडी, पायांत वाहाणा किंवा जोडा, आणि हातांत काठी; येवढा काय तो पोषाख. कित्येकांस तर लंगोटी, पटकूर, व काठी, यांखेरीज कांहीं मिळत नाहीं, तथापि त्यांच्यामध्यें करामत मोठी असते.

कुणब्याचा मुलगा सहा वर्षांचा झाला कीं, त्याला गुरें वळण्यास लावतात, तेथें पांचपन्नास गुरांवर तो चांगला दाव ठेवतो. त्याच्यापेक्षां अनेक पटीनें बलवान पशूही त्या लहानशा गुराख्यास चळचळां कांपतात, आणि त्याच्या आज्ञेंत वागतात. कसलेंही आडदांड गुरूं असलें तरी गुराख्याच्या हाताखालीं येतांच तें मऊ होतें. त्याला एखादें गुरूं जुमानिनासें झालें तर त्याच्या गळ्यांत भल्लें लठ्ठ लोंढणें बांधून किंवा पायखूट घालून त्यास तेव्हांच तो मेंढी करून टाकतो. मनुष्य प्राण्याचा पराक्रम किती मोठा आहे!! अशा मनुष्यांस थोडें बहुत जरी विद्येचें शिक्षण देऊन शहाणे केले तर मोठेपणी आपआपल्या धंद्यांत ते किती उपयोगीं होतील?

आमचे शेतकरी फार गरीबीस आले आहेत खरे, परंतु त्यांतल्या त्यांतच थोडीशी सवड करून आपल्या मुलांस अल्पस्वल्प जरी विद्या शिकवितील तरी पुढें त्यांस फार मोठा लाभ होईल. त्यांचे तेच ज़र मनावर घेतील तर ही गोष्ट होणारी आहे.

दुपार उलटल्यावर गुराखी पुन: गुरें कुरणांत चारण्यास नेतात, आणि संध्याकाळच्या वेळेस त्यांस हाकून घरीं आणतात. गुरांस जेथल्या तेथें बांधून वैरणकाडी घातल्यावर गुराखी मोकळे होतात. मग रात्री मातेच्या हातचीं ऊनऊन भाकर पोटभर खाऊन तृप्त होतात, आणि मग स्वस्थपणें झोंपी जातात. अशा वयांत गुराख्यांच्या मनास फार काळजी नसते, म्हणून भूमीवर लवंढतांच त्यांस स्वस्थ झोंप लागते.

# खेडेगांवांतील आपसांतले तंटे.

गांव तेथें म्हारवडा असतो. त्याप्रमाणें खेडें असो, कसबा असो, किंवा मोठ्या वस्तीचें शहर असो तरी तेथें तंटे बखेडे होतात. अगदीं भिकाऱ्यापासून तों श्रीमानापर्यंत, व अडाणी मनुष्यांपासून तों शहाणे लोकांपर्यंत 'कलीनें' सर्वांस ग्रासलें आहे. त्याच्या वेसणींत सांपडला नाहीं असा मनुष्य विरळा. कलहाग्नीस चेतविणारे कलीचे नारद जिकडे तिकडे भरले आहेत. ते संधी पाहातच असतात. कोठें कलहाची जराशी ठिणगी चमकली, किंवा धूर दिसला कीं, लागलीच हे बुवा पुढें सरसावतात, आणि कमजोरामुळें ती विझेलशी वाटल्यास तिजवर तेल ओतून किंवा वारा घालून तिला पेटवितात. आंगजोरानें किंवा ह्यांच्या प्रसादानें एकदां कलहाग्नि भडकला म्हणजे मग ह्या नारद मुनीचें शेत पिकलें. ही गोष्ट सर्वांच्या अनुभवाची आहे.

खेड्यापाड्यांतले लोक गरीब व अज्ञानी असतात खरे, तरी त्यांच्यांत शेतांच्या बांधांचे, घरांच्या हद्दीचे, भाऊबंदकीच्या वांटणीचे, व देवघेवीच्या व्यवहाराचे असे अनेक प्रकारचे तंटे प्रसंगानुरूप उद्भवतात. त्यांचा मूळ उगम पाहिला तर फार लहान असतो. वादग्रस्त वस्तूची किंमतच केली तर एक दोन रुपये सुद्धां नसते, परंतु गांवांतील कलीचे नारद दोन्ही पक्षांस खोट्यानाट्या थापा देऊन चढीस लावतात. घरांत खाण्याची भ्रांती पडली तरी चिंता नाहीं, पण शेंकडो रुपये खर्चून प्रतिपक्षाची या वेळेस खोड मोडलीच पाहिजे, अशी त्यांस ते भर

देतात ! मधावर माशी जशी विलगते त्याप्रमाणें गांवांतले गांवगुंड हे निवट व ऐपतदार लोकांवर टपून बसलेले असतात. धनवानाच्या किंवा खात्यापित्याच्या घरांत केव्हां फूट पडेल, आणि त्याजवर आम्हीं कधीं टोंच्या मारूं; हें रात्रंदिवस काक दृष्टीनें ते बघीत असतात, यामुळें परस्परांत आलेली तेड नखानें तुटणारी असतां कळचेटे लोक लावालावी करून व एकमेकांस नसत्या चुगल्या सांगून तिला फार फुगवितात, आणि शेवटीं आपलीं पोटें जाळण्यासाठीं क्षुल्लक गोष्टींवर बिचाऱ्या अज्ञान पक्षकारांस कुऱ्हाडीचे घाव मारण्यास लावतात ! ! अशा लुच्चांच्या मसलतीनें एकदां सरकारची पायरी चढण्याचा प्रसंग आला कीं, मग दोन्हीं बाजूंच्या घरादारांस, ऐपतीस, व अब्रूस धुपणी लागते.

ह्या भिकार वादांच्या पायीं शेंकडों लोकांचीं घरेंदारें, शेतवाड्या, संपत्ति, आणि अब्रू ह्यांचें वाटोळें होऊन फडशा उडाला आहे. कित्येकांनीं ह्या फजीतीच्या वैतागानें गांव सोडले, ते पुनः परत आलेच नाहींत. वादाच्या पायीं बुडालों नाहीं असें म्हणणारे वादी किंवा प्रतिवादी फारच थोडे सांपडतील. चोरी झाली, घरावर दरवडा पडला, किंवा अग्निनारायणाचा कोप झाला तरी तो पुरवेल, पण वाद भांडून शेवटास जाणें कोणासही पुरवणार नाहीं. पैक्याच्या जोरानें खाबू लोकांच्या मसलतीस लागून कृपण व शहाणे लोक देखील चढीस लागतात, परंतु भांडतां भांडतां जसजसे हलके होत जातात, तसतसे ते शुद्धीवर येऊं लागतात, पण मग आवरण्याचें त्यांचे हातीं राहात नाहीं. फिरत असलेल्या चरकांत एकदां ऊस सांपडला,

ह्मणजे त्याचा सगळा रस निघून तो चिपाड झाल्या खेरीज बाहेर पडत नाहीं. त्याच प्रमाणें न्यायाच्या चरकांत एकदां मनुष्य सांपडला कीं पुरे, तो कितीही भिकारी किंवा धनाढ्य असला तरी त्याच्या ऐपती प्रमाणें त्यास पिळून काढल्या खेरीज तो कदापि सोडीत नाहीं हा त्याचा धर्म आहे.

याकरितां वाद भांडणाऱ्या लोकांनीं फार विचार करून व दूरवर दृष्टी देऊन मग न्याय दरबारांत शिरावें. वादी प्रतिवादी समुरा समूर बसून, शुद्ध मनानें वादग्रस्त विषयाचा सलोख्यानें विचार करतील तर, आपआपसांत परस्परानीं एकमेकांस कितीही नाडलें किंवा एकानें अजिबात हार खाल्ली, तरी मोठेंसें नुकसान होणार नाहीं. शिवाय उभयतांचा वेळ वांचेल व सलोखा राहील. परंतु भांडतां भांडतां एका पक्षाला पूर्ण जय मिळाला तरी, वादाचे लढाईचा खर्च भरतां भरतां तो अगदी जेरीस येतो. ही गोष्ट सर्वांनींच लक्षांत ठेवण्या सारखी आहे. खेडेगांवच्या लोकांनीं तर ती फार ध्यानांत धरावी. कारण खेडेगांवांतील शेतकऱ्यांच्या पदरीं आदींच गरीबी फार असते, व त्यांस न्याय खात्यांतल्या कायद्याच्या समुद्राची माहिती नसते, यामुळें पावलो पावलीं न्याय दरबारांतील दलालांच्या पाय धरण्या करून मुठी दाबाव्या लागतात. तेणेंकरून बिचारे गरीब शेतकरी हां हां म्हणतां लख्ख होऊन जातात. यास्तव. शेतकऱ्यांनीं व शेट सावकारांनीं ही गोष्ट विचारांत घेऊन होईल तितक्या युक्तीनें व प्रयत्नानें ‘ कळीच्या नारदाचा ’ आपल्या व्यवहारांत शिरकाव न होऊं देतां आपसांतल्या आपसांत तंटे मिटवीत जावे. यांत उभय-

पक्षांचें व सर्व गांवच्या लोकांचेंही फार हित आहे. ह्या दुष्ट कळचेटयांनीं आजवर एका दिवसळईनें हजारों घरें पेटविलीं आहेत, व शेंकडो वणवे लावले *आहेत!!!* हें पक्कें *ध्यानांत* धरून सर्वांनीं आपला वर्तन क्रम ठेवल्यास फार उपयोग होईल.

## खेडेगांवचे अधिकारी व सावकार यांस प्रार्थना.

मित्रहो, आपणास हात जोडून मी थोडी विनंती करीत आहें, तिचा आपण शांतपणानें व न्यायबुद्धीनें चांगला विचार कराल तर परमेश्वर तुमचें खचित कल्याण करील.

देवाच्या दयेनें तुम्ही ग्रामाधिकारी आहांत. गांव लहान कां असेना तरी पाटील ह्मणजे गांवचा राजा, कुळकर्णी त्याचा दिवाण, व वलुतीं हे त्यांच्या हाताखालचे कामगार. अशा प्रकारें प्राचीन काळा पासून तुमच्या पूर्वजांनीं संपादन केलेलें गांवचें राज्य वंशपरंपरेनें आज तुमच्या हातीं आलें आहे. म्हणून तुम्ही खेडेगांवचे राजे, आणि त्यांतले सर्व शेतकरी ही तुमची प्रजा; असा संबंध घडला आहे. म्हणून "राजानें आपल्या प्रजेचें पुत्रवत पालन करावें. हा त्याचा मुख्य धर्म तो तुमच्याकडे आला आहे" म्हणून त्याप्रमाणें वागण्याची तुमच्यावर आतां जबाबदारी आली आहे हें ध्यानांत धरा. 'यथा राजा तथा प्रजा' ह्या म्हणीप्रमाणें जसें तुम्ही वागाल तशी तुमची प्रजा वागणार. तुम्ही शहाणे, उद्योगी

व प्रामाणिक निपजलां तर लोक तसे होतील. आणि तुम्हीच जर मूर्ख, आळशी, व अप्रामाणिक व्हाल तर लोकही तोच कित्ता गिरविणार. यावरून आपल्या ध्यानांत आलेंच असेल कीं, गांवच्या लोकांची स्थिति वाईट किंवा चांगली करण्याची किल्ली केवळ तुमच्या हातीं आहे. म्हणून तुम्ही जशी तिला फिरवाल तसे लोक होणार आहेत. तर आतां तुम्हींच सांगा कीं, गांवातले सगळे लोक मूर्ख आळशी, लबाड, दुर्व्यसनी, व कंगाल होऊन भिकेस लागून गेले तर बरे. किंवा शहाणे, उद्योगी, प्रामाणिक, सुखी, व गबर होऊन गांवांतच सुखानें नांदूं लागले तर बरे. मला खचित वाटतें कीं, लोकांची धूळधाण होऊन त्यांणीं देशोधडीस जाण्यापेक्षां ते गांवांतच सुखानें नांदतील तर तुम्हास फार संतोष व लाभ होईल. बरें, आतां तुमच्या गांवाची अशी चांगली स्थिति व्हावी अशी खरोखरच तुमची इच्छा असेल तर पुढील सुचनेप्रमाणें तुम्ही खचीत वागाल, हा भरंवसा धरून दोन गोष्टी सांगतों त्या ऐका.

१. विद्या शिकण्यास आरंभ करून तिचा नेमानें पाठलाग करा, म्हणजे ती तुम्हास शहाणे करील.
२. उद्योगी व्हा, आळसांत पडून राहूं नका.
३. खरेपणानें वागा, लबाडींत शिरूं नका.
४. खर्च बेताबातानें करून कांहीं तरी संग्रहास टाकीत जा.
५. गांवांतील तंटे बखेडे युक्तीनें आपसांत मिटवा. उगीच धसास लावून भांडणाचे पायीं आपली जिनगी व अब्रू व्यर्थ गमावूं नका.

पक्षांचें व सर्व गांवच्या लोकांचेंही फार हित आहे. ह्या दुष्ट कळचेटयांनीं आजवर एका दिवसळईनें हजारों घरें पेटविलीं आहेत, व शेंकडो वणवे लावले आहेत!!! हें पक्कें ध्यानांत धरून सर्वांनीं आपला वर्तन क्रम ठेवल्यास फार उपयोग होईल.

---

## खेडेगांवचे अधिकारी व सावकार यांस प्रार्थना.

मित्रहो, आपणास हात जोडून मी थोडी विनंती करीत आहें, तिचा आपण शांतपणानें व न्यायबुद्धीनें चांगला विचार कराल तर परमेश्वर तुमचें खचित कल्याण करील.

देवाच्या दयेनें तुम्ही ग्रामाधिकारी आहांत. गांव लहान कां असेना तरी पाटील ह्मणजे गांवचा राजा, कुळकर्णी त्याचा दिवाण, व बलुतीं हे त्यांच्या हाताखालचे कामगार. अशा प्रकारें प्राचीन काळा पासून तुमच्या पूर्वजांनीं संपादन केलेलें गांवचें राज्य वंशपरंपरेनें आज तुमच्या हातीं आलें आहे. म्हणून तुम्ही खेडेगांवचे राजे, आणि त्यांतले सर्व शेतकरी ही तुमची प्रजा; असा संबंध घडला आहे. म्हणून "राजानें आपल्या प्रजेचें पुत्रवत पालन करावें. हा त्याचा मुख्य धर्म तो तुमच्याकडे आला आहे" म्हणून त्याप्रमाणें वागण्याची तुमच्यावर आतां जबाबदारी आली आहे हें ध्यानांत धरा. 'यथा राजा तथा प्रजा' ह्या म्हणीप्रमाणें जसें तुम्ही वागाल तशी तुमची प्रजा वागणार. तुम्ही शहाणे, उद्योगी

व प्रामाणिक निपजलां तर लोक तसे होतील. आणि तुम्हीच जर मूर्ख, आळशी, व अप्रामाणिक व्हाल तर लोकही तोच कित्ता गिरविणार. यावरून आपल्या ध्यानांत आलेंच असेल कीं, गांवच्या लोकांची स्थिति वाईट किंवा चांगली करण्याची किल्ली केवळ तुमच्या हातीं आहे. म्हणून तुम्ही जशी तिला फिरवाल तसे लोक होणार आहेत. तर आतां तुम्हींच सांगा कीं, गांवातले सगळे लोक मूर्ख आळशी, लबाड, दुर्व्यसनी, व कंगाल होऊन भिकेस लागून गेले तर बरें. किंवा शहाणे, उद्योगी, प्रामाणिक, सुखी, व गबर होऊन गांवांतच सुखानें नांदूं लागले तर बरें. मला खचित वाटतें कीं, लोकांची धूळधाण होऊन त्यांणीं देशोधडीस जाण्यापेक्षां ते गांवांतच सुखानें नांदतील तर तुम्हास फार संतोष व लाभ होईल. बरें, आतां तुमच्या गांवाची अशी चांगली स्थिति व्हावी अशी खरोखरच तुमची इच्छा असेल तर पुढील सुचनेप्रमाणें तुम्ही खचीत वागाल, हा भरंवसा धरून दोन गोष्टी सांगतों त्या ऐका.

१. विद्या शिकण्यास आरंभ करून तिचा नेमानें पाठलाग करा, म्हणजे ती तुम्हास शहाणे करील.
२. उद्योगी व्हा, आळसांत पडून राहूं नका.
३. खरेपणानें वागा, लबाडींत शिरूं नका.
४. खर्च बेताबातानें करून कांहीं तरी संग्रहास टाकीत जा.
५. गांवांतील तंटे बखेडे युक्तीनें आपसांत मिटवा. उगीच धसास लावून भांडणाचे पायीं आपली जिनगी व अब्रू व्यर्थ गमावूं नका.

६. सर्वांशीं नेकीनें, नम्रतेनें, व ममतेनें वागून रयतेचें कल्याण करण्याचे प्रयत्न करीत जा.

७. गांवच्या सर्व लोकांचें हित तेंच तुमचें हित असें समजून लोक राजी राहातील इतकी स्वार्थबुद्धी धरा.

८. गांवचे सर्व लोक साधारण गोष्टींत एका जुटीनें कसे राहातील, ही काळजी धरून गांवांत सर्वांची एकी वाढवा.

९. गांवांत एखादें कूळ थकलें भंगलें तरी त्यास उधळूं न देतां सर्वांनीं हातभार लावून त्यास जाग्यावर बसवा.

१०. गांवचे शेतकरी व इतर लोक शहाणे व उद्योग निपुण कसे होतील ही सर्वांनीं नेहेमीं चर्चा करून त्याच्या सिद्धयर्थ अखंड प्रयत्न चालू ठेवा.

११. तुमच्या गांवांतील एकाही माणसावर सरकार व सावकार वांकड्या डोळ्यानें कधींही बघणार नाहीं अशी स्थिति सर्वांच्या शहाणपणानें व उद्योगानें प्राप्त करून घ्या म्हणजे तुम्ही जिंकली.

ह्या गोष्टी पुष्कळ व पाळण करण्यास कठीण असें प्रथम तुम्हास वाटेल खरें, परंतु निश्चयानें कांहीं दिवस हा क्रम चालू ठेवाल तर लवकरच तुम्हास त्या सोप्या वाटतील. जो दैवशाली पाटील हा क्रम आपल्या गांवांत चालू ठेवील त्याच्या गांवांतलें सर्व दरिद्र व दुःख पळून जाईल यांत संशय नाहीं. वरील गोष्टी पाटलास लक्षून लिहिल्या आहेत खऱ्या, तथापि सर्वांनीं त्या ग्रहण केल्या असतां कल्याणच होईल. आपलें बरें किंवा वाईट करणें हें शुद्ध आपल्याच हातावर आणि वर्तनावर आहे, म्हणून त्यांची

खबरदारी आपणच घेतली पाहिजे. आपण सरळ मार्गानें चालून उपयुक्त उद्योग हातानीं करीत असल्यास परमेश्वर कधींच न्यून पडूं देत नाहीं, हें सर्वांनीं पक्कें ध्यानांत ठेवावें.

वर पाटीलबुवांची प्रार्थना केली. आतां गांवच्या शेटसावकारांची थोडी प्रार्थना करतों. शेटजी, आपण खेडेगांवचे कुबेर, म्हणून गांवांतल्या सगळ्या लोकांचा खजिना तुमच्या जवळ राहतो. गांवांत कोण माणूस किती ऐपतीचा आहे, त्याची साक कशी आहे, तो बोलल्याप्रमाणें कितपत वागतो, ह्याची तुम्हास खड्यान-खडा माहिती आहे. त्याचप्रमाणें गांवांत लुच्चा कोण, भोळा कोण, प्रतिष्ठित व साळसूद कोण, इत्यादि गोष्टी सर्व तुमच्या लक्षांत आहेतच. तुम्ही आपल्या सावकाराजवळ प्रामाणिकपणानें वागून पत राखता, तुम्ही दुर्व्यसनांत किंवा वाईट फंदांत शिरून उल्लू होत नाहीं. खाण्यापि-ण्यांत व वागणुकींत फार नेमस्तपणा राखतां, यामुळें कधीं प्रकृति बिघडत नाहीं, व लोकांशीं शब्दांचा वांकडेपणा येत नाहीं. आपल्या उद्योगाची व खर्चाच्या काटकस-रीची कमाल आहे. शेंकडों कोसांवरून इतक्या दूर परमुलखीं येऊन पैसा कसा मिळवावा, आणि पैसा पैसा जमवून त्याचा रुपया कसा बांधावा; नंतर तो वाढत्या मार्गांत ठेवून कसा राखावा, इत्यादि ज्ञानाचें आपण भां-डारच आहांत. तात्पर्य असले अनेक सद्गुण आपल्या-मध्यें आहेत म्हणूनच लक्ष्मी हात जोडून तुमच्यापुढें उभी राहाते. तुम्ही इतके थोर आहांत म्हणून आतां कृपा करून खरें सांगा कीं, ज्या वेळेस ह्या खेड्यांत आपण

आलां तेव्हां बरोबर कितीशी पुंजी आणली होती? थोडी-च असेल तर आज जे आपण येवढे भांडवलदार बनलां ते ह्याच खेडयांतल्या गरीब शेतकऱ्यांचे जिवावरच नाहीं कां? तर आतां हे लंगोटेच आपल्या पैक्याचीं झाडें असें नाहीं का होत? होय, हें सगळें खरें आहे. तर आंतां हीं असलीं पैका देणारीं झाडें तुम्ही मुळ्यांसकट खणून टाकल्यास बरें होईल, किंवा त्यांस जगवून त्यांजवर दर साल येणारीं फळें तोडून खाल तर बरें होईल? ह्याचा तुम्हीच उलगडा सांगा.

तुम्ही व्याजाबट्याच्या व वाढीदिढीच्या करामतीनें आज त्यांच्या डोईवर हजारों रुपये कर्ज वाढिवलें आहे. त्या भारानें ते बिचारे करकरां वांकले आहेत. अशा गरी-बांचा उन्हाळा करून त्यांस हुसकून देण्यास तुम्हास क्षणही लागणार नाहीं; कारण गांवांतले पाटील कुळ-कर्णी व हुशार लोक सगळे तुमच्या मुठींत. तुम्ही दि-वाण दरबारांत कोठेंही गेलां तरी द्रव्याच्या जोरानें सर्व लोक तुम्हास वश होतात. अशा तुमच्या तेजानें त्या बिचाऱ्यांचें वाटोळें होण्यास काय उशीर? परंतु थोडा विचार करून बघाल तर तुमच्या हातीं हे भोळे व अज्ञान लोक लागले म्हणूनच मातीसारखा पैका मिळवितां आला. हेच जर खरमरीत व शहाणे असते तर तुमच्या हातीं काय लागतें?

शहारासारख्या वस्तींत चार महिन्यांत दिढी धान्य पदरीं पडतें का? किंवा दर रुपयास एक आणा व्याज तरी मिळतें का? नाहीं कधीं मिळणार नाहीं, याकरितां आपणास हात जोडून प्रार्थना आहे कीं, गरीब बिचाऱ्या

कष्टाळू व अज्ञान अशा शेतकऱ्यांच्या मानेवर कसाबाप्रमाणें तुम्ही सुरी ठेवूं नका, त्यांना संभाळून घ्या, त्यांनवर दया करा, अडी-अडचणीच्या वेळीं त्यांच्या उपयोगीं पडा, असें कराल तर देव तुमचें कल्याण करील. तुम्ही हें न ऐकतां सुराच बाहेर काढाल तर सगळ्या शेतकऱ्यांच्या तळतळाटानें व शापानें देवाचा तुमच्यावर कोप होईल, आणि शेतकऱ्यांच्या कायद्यासारखा आणखी एखादा कायदा निघून तो तुमच्या बोकांडीस बसेल. हें जाणून माझ्या विनंतीप्रमाणें शेतकऱ्यांवर दया करून उभयतांही सुखानें नांदा यांत फार मौज आहे.

## खेडेगांवच्या शेतकऱ्यांस सूचना.

खेडगांवच्या शेतकऱ्यांत दरिद्र फार वाढण्यास अनेक कारणें झालीं आहेत त्यामध्यें अज्ञान हें श्रेष्ठ होय. विपत्तीमुळें सावकारांचीं व मारवाड्यांचीं घरें त्यांस नेहेमी पहावीं लागतात, पण त्यांच्याशीं व इतरांशीं किती सावधगिरीनें वागलें पाहिजे हें त्यांस कळत नाहीं. यामुळें वारंवार अनेक कारणांनीं फार नुकसान होतें तें टाळतां यावें म्हणून थोड्या सूचना करतों.

१. शेतकरी लोक सावकारांपासून कर्ज काढतात, आणि त्यांस रोखे लिहून देतात. त्या वेळेस उभयतांमध्यें व्याजाचे व अटीचे जे करार ठरतात, ते दस्तऐवजांत बराबर लिहिले आहेत कीं नाहीं, हें कुळानीं चांगली चौकशी करून आपली खातरजमा करून घेणें अवश्य आहे; कारण खत लिहिणारे लोक बहुधा सावकारांचे

मिंधे असल्यामुळें सावकारांचे मर्जीमाफक चालण्याचा फार संभव असतो. यामुळें सावकार व खत लिहिणारा हे मयल्यास पूर्वी ठरल्यापेक्षां व्याजाचा दर आधिक लिहितील, किंवा ठरावापेक्षां अटी भलत्याच अगर कडक घालतील, आणि खत वाचते वेळेस खतांत लिहिलेला खरा लेख वाचून न दाखवितां कुळानें कबूल केल्याप्रमाणें मजकूर वाचून दाखवून खतावर कुळाची सही किंवा निशाणी करून घेतील. परंतु रकमेचा उलगडा करते वेळेस किंवा दस्ताऐवजावरून फिर्याद झाल्यास चौकशीच्या वेळेस ही गोष्ट उघाडीस येऊन ती कुळास कळली म्हणजे मग फार वाईट वाटेल, व नुकसानही होईल. असे प्रकार कोठें कोठें लवाडीनें घडतात. याकरितां दस्तऐवज लिहून पुरा झाल्यावर लिहिणारावर व सावकारावर भरंवसा न ठेवतां आपल्या खात्रीच्या माणसाकडून तो वाचवावा, आणि ठरल्याप्रमाणें तो बरोबर लिहिला आहे अशी पक्की खात्रीं झाल्यावर त्याजवर सही किंवा निशाणी करून मग सावकाराचे हवालीं करावा. म्हणजे लवाड्या होण्याचा मार्ग बंद होईल.

२. शेतकरी लोक सावकारांस वसूल देतात त्यांत रोख रुपये, धान्य, कडबा आणि गवत इत्यादि अनेक प्रकार असतात. त्याप्रमाणें वसूल देतांच कुळानें सावकाराजवळून पावती किंवा यादी मांडून घ्यावी; कारण सलोख्यानें व्यवहार चालतो तोंवर अडचण नसते, पण प्रसंगीं फिर्याद होऊन कोर्टांत जाणें झाल्यास दिलेला वसूल पावती नसल्यास मजुरा मिळणें फार कठीण पडतें. वास्तव कोणतेही प्रकारानें वसूल दिला तरी तो जेव्हांचे

तेव्हां माडून घेऊन पावतीचे कागद नीट जपून दप्तरांत बांधून ठेवीत जावे.

३. सावकारास लिहून दिलेला दस्तऐवज किंवा खतें कायद्याबाहेर जाण्याची वेळ आल्यास फेरखत लिहून द्यावें लागतें, तेव्हां फार जपत जावें. अशा दस्तऐवजांत मागील खतांतील मुद्दल रक्कम किती, व व्याज किती, हें स्पष्ट लिहिण्यास सांगावें; कारण कोर्टांत जाण्याची वेळ आल्यास हें कर्ज कशा प्रकारचें आहे हें समजण्यास फार सोयीवार होतें. याकरितां पूर्वीच्या व्याज मुद्दलाची खत लिहिणारानें नीट फोड केली आहे कीं नाहीं ह्याची पक्की खात्री करून घेऊन मग दस्तऐवज पुरा करून द्यावा.

४. जमिनीच्या संबंधाचे तंटे आलीकडे फार माजले आहेत, व तेणेंकरून कुळांचें नुकसानही फार होतें. अनेक ठिकाणीं जमिनीचें खातें एका इसमाचे नांवचें असून पोट हिस्सेदार पुष्कळ असतात. यामुळें धाऱ्याचा पैसा आपआपल्या हिश्शाप्रमाणें पट्टीच्या वेळेस ज्याचा तो भरतो, परंतु कुळकर्णी लोक वसूल देणाराची हस्तें न लावतां खातेदाराची लावतात, यामुळें पोट हिशाबद्दल तंटा पडल्यास पोट कुळाचें फार नुकसान होतें. यास्तव असा प्रकार असेल तेथें कुळांनीं फार सावध रहावें. वसूल दिल्याबरोबर आपण दिलेल्या रकमेस आपली हस्तें लावावी, आणि लागलीच कुळकर्ण्यापासून पावती मांडून घ्यावी, व ती नीट जपून ठेवावी. म्हणजे जमिनीबद्दल तंटा पडल्यास ती पुराव्याचे कामास फार उपयोगी पडेल. अशा रीतीनें पोट कुळास निराळी पावती देणें हें कायदेशीर आहे.

५. एकाद्या दस्तऐवजावरून अगर खात्यावरून शेतकऱ्यांवर फिर्याद झाली असतां ते कोर्टांत हजर होत नाहींत. यामुळें त्यांचें फार नुकसान होतें. त्याचे प्रकार असे आहेत कीं, फिर्यादींत दाखल केलेल्या रकमेपैकीं कांहीं वसूल रोख अगर अन्य रूपानें दिला असून तो सावकाराच्या नजर चुकीनें अगर लोभीपणानें वजा केला नसल्यास तो कोर्टास कळण्याचा संभव नसतो. यामुळें एकतर्फी पुराव्यावर भरंवसा ठेवून वादीस कोर्टाकडून निवाडा मिळतो, पण असा प्रकार एकदां होऊन गेल्यावर मग कांहीं केलें तरी दिलेला वसूल कुळास मजुरा मिळण्याचा मार्ग खुंटतो. यास्तव फिर्याद होतांच समानांत नेमल्या तारखेस हजर होऊन आपली हकीकत कोर्टास जाहीर करावी. म्हणजे कांहीं तरी विचार होण्याचा संभव असतो, आणि स्थितीप्रमाणें हप्त्या हप्त्यानीं वसूल देण्याबद्दलही कोर्ट ठराव करतें. तेणेंकरून कुळास कांहीं तरी सवड मिळते. हें लक्षांत आणून फिर्याद झाल्यावर कोर्टांत हजीर होण्यास हयगय करूं नये. प्रसंग आला म्हणजे तो सर्वांसच वांकिवतो. मग व्यर्थ ताठा धरून. किंवा तोंड चुकवाचुकवी करून काय फळ ? त्यास योग्य रीतीनें सादर व्हावें हेंच प्रशस्त व हितकारक आहे.

६. पुणें, सातारा, अहमदनगर व सोलापूर ह्या चार जिल्ह्यांतील शेतकऱ्यांच्या बचावाकरितां सरकारानें आलीकडे स्वतंत्र कायदा केला आहे. त्याप्रमाणें त्यांच्या फिर्यादींचें काम चालतें. सरकारानें कुळांच्या सोयीकरितां जागोजाग मध्यस्थ नेमून त्यांच्यापुढें प्रथम तोडजोड व्हावी अशीही सोय काढली आहे, परंतु तिचा शेतकरी

लोक चांगला उपयोग करून घेत नसल्यामुळें ते फार नुकसानींत येतात; कारण शेतकऱ्यांवर देण्या घेण्याची कसलीही फिर्याद करणें झाल्यास ती प्रथम मध्यस्थापुढें न्यावीच लागते. त्यांच्या दाखल्या खेरीज दिवाणी कोर्टानें ती हातीं धरूं नये, असा कायदा असल्यामुळें सावकारांचे मनांत नसले तरी मध्यस्थांकडे फिर्याद नोंदावीच लागते. मध्यस्थांनी [illegible] [illegible]न आपली हकीकत सांगतील तर त्यांचे म्हणण्याचा नीट विचार करून त्यांचे बचावाजोगा वादीचे सलोख्यानें निकाल होण्याचा फार संभव आहे, परंतु कित्येक कुळें मुळींच हजर होत नसल्यामुळें निरुपायास्तव मध्यस्थांकडून वादीस कोर्टांत जाण्याचा दाखला मिळतो, परंतु तेणेंकरून गरीब शेतकऱ्यांचें फार नुकसान होतें. मध्यस्थांचे कोर्टांत चालणाऱ्या फिर्यादीस छापील कागदाचा व वकिलाचा वगैरे खर्च लागत नाहीं. शिवाय आपसांत सूट व हप्तेबंदी माफक ठरण्याचा फार संभव असतो, त्या सर्व लाभास शेतकरी अंतरतात. सावकार तरी निरुपायामुळेंच कोर्टांत जातात, पण तेथें गेल्यानें फिर्याद चालविण्याचा सर्व खर्च त्यास प्रथम भरावा लागतो. तो होऊन गेल्यावर मग कूळ हजर झालें आणि उभयतांमध्यें तोडजोडीचें बोलणें सुरू झालें तरी सावकारास आपला हात फार सईल सोडवत नाहीं; कारण फिर्यादीचा सर्व खर्च अगोदर रोख झाला असतो, तो तर कुळापासून घ्यावाच लागतो, व झालेल्या त्रासानें त्याचें मन खट्टू झालें म्हणजे कुळावरील प्रीति कमी होते. यामुळें सावकार सहसा कांहीं सोडीत नाहीं. ही गोष्ट मनांत आणून वरील

५. एकाद्या दस्तऐवजावरून अगर खात्यावरून शेत-कऱ्यांवर फिर्याद झाली असतां ते कोर्टांत हजर होत नाहींत. यामुळें त्यांचें फार नुकसान होतें. त्याचे प्रकार असे आहेत कीं, फिर्यादींत दाखल केलेल्या रकमेपैकीं कांहीं वसूल रोख अगर अन्य रूपानें दिला असून तो सावकाराच्या नजर चुकीनें अगर लोभीपणानें वजा केला नसल्यास तो कोर्टास कळण्याचा संभव नसतो. यामुळें एकतर्फी पुराव्यावर भरंवसा ठेवून वादीस कोर्टाकडून निवाडा मिळतो, पण असा प्रकार एकदां होऊन गेल्यावर मग कांहीं केलें तरी दिलेला वसूल कुळास मजुरा मिळण्याचा मार्ग खुंटतो. यास्तव फिर्याद होतांच समानांत नेमल्या तारखेस हजर होऊन आपली हकीकत कोर्टास जाहीर करावी. म्हणजे कांहीं तरी विचार होण्याचा संभव असतो, आणि स्थितीप्रमाणें हप्त्या हप्त्यांनीं वसूल देण्याबद्दलही कोर्ट ठराव करतें. तेणेंकरून कुळास कांहीं तरी सवड मिळते. हें लक्षांत आणून फिर्याद झाल्यावर कोर्टांत हजीर होण्यास हयगय करूं नये. प्रसंग आला म्हणजे तो सर्वांसच वांकवितो. मग व्यर्थ ताठा धरून किंवा तोंड चुकवाचुकवी करून काय फळ ? त्यास योग्य रीतीनें सादर व्हावें हेंच प्रशस्त व हितकारक आहे.

६. पुणें, सातारा, अहमदनगर व सोलापूर ह्या चार जिल्ह्यांतील शेतकऱ्यांच्या बचावाकरितां सरकारानें अलीकडे स्वतंत्र कायदा केला आहे. त्याप्रमाणें त्यांच्या फिर्यादींचें काम चालतें. सरकारानें कुळांच्या सोयीकरितां जागोजाग मध्यस्थ नेमून त्यांच्यापुढें प्रथम तोडजोड व्हावी अशीही सोय काढली आहे, परंतु तिचा शेतकरी

लोक चांगला उपयोग करून घेत नसल्यामुळें ते फार नुकसानींत येतात; कारण शेतकऱ्यांवर देण्या घेण्याची कसलीही फिर्याद करणें झाल्यास ती प्रथम मध्यस्थापुढें न्यावीच लागते. त्यांच्या दाखल्या खेरीज दिवाणी कोर्टानें ती हातीं धरूं नये, असा कायदा असल्यामुळें सावकारांचे मनांत नसले तरी मध्यस्थांकडे फिर्याद नोंदावीच लागते. मध्यस्थांनीं [illegible] [illegible] आपली हकीकत सांगतील तर त्यांचे म्हणण्याचा नीट विचार करून त्यांचे बचावाजोगा वादीचे सलोख्यानें निकाल होण्याचा फार संभव आहे, परंतु कित्येक कुळें मुळींच हजर होत नसल्यामुळें निरुपायास्तव मध्यस्थांकडून वादीस कोर्टांत जाण्याचा दाखला मिळतो, परंतु तेणेंकरून गरीब शेतकऱ्यांचें फार नुकसान होतें. मध्यस्थांचे कोर्टांत चालणाऱ्या फिर्यादीस छापील कागदाचा व वकिलाचा वगैरे खर्च लागत नाहीं. शिवाय आपसांत सूट व हप्तेबंदी माफक ठरण्याचा फार संभव असतो, त्या सर्व लाभास शेतकरी अंतरतात. सावकार तरी निरुपायामुळेंच कोर्टांत जातात, पण तेथें गेल्यानें फिर्याद चालविण्याचा सर्व खर्च त्यास प्रथम भरावा लागतो. तो होऊन गेल्यावर मग कूळ हजर झालें आणि उभयतांमध्यें तोडजोडीचें बोलणें सुरू झालें तरी सावकारास आपला हात फार सईल सोडवत नाहीं; कारण फिर्यादीचा सर्व खर्च अगोदर रोख झाला असतो, तो तर कुळापासून घ्यावाच लागतो, व झालेल्या त्रासानें त्याचें मन खट्टू झालें म्हणजे कुळावरील प्रीति कमी होते. यामुळें सावकार सहसा कांहीं सोडीत नाहीं. ही गोष्ट मनांत आणून वरील

चार जिल्ह्यांतल्या शेतकऱ्यांनीं आपल्यावर फिर्याद झाल्यास मध्यस्थांकडे हजीर व्हावें, आणि त्यांस आपली सर्व हकीकत कळवावी. म्हणजे फिर्यादीचा खर्च आंगावर न बसतां आपल्यास पुष्कळ हितकारक असा आपसांत निकाल होईल. अशा प्रकारें निकाल झाल्यानें कुळें व सावकार ह्या दोघांसही लाभच आहे. सावकार व कुळें यांचें परस्परांत सख्य रहावें हें दोघांसही हितकारक आहे. कुळांस सावकारांची व सावकारांस कुळांची नेहेमी गरज लागणार. याकरितां दोघांचा बेबनाव होणें उभयतांसही इष्ट नाहीं, परंतु सख्य संबंध चिरकाल टिकविणें हें केवळ एकाचे हातीं नाहीं. याकरितां दोघांनींही तो कायम राखण्याकरितां फार काळजीनें जपावें म्हणजे बरें. आतां कित्येक ठिकाणचे मध्यस्थ निस्पृह व असावे त्या गुणाचे नसल्यामुळें कुळांची कुरकूर ऐकूं येते, परंतु असली कुरकूर घरांतल्या घरांत करून उपयोग नाहीं, तर पुष्कळ गांवच्या लोकांनीं विचार करून जो मध्यस्थ योग्य दिसेल तो नेमण्याविषयीं स्पेशल जज्ज साहेबांस अर्ज केल्यास त्याचा योग्य विचार होईल, परंतु आपणच अनेक प्रकारांनीं झालेल्या सोयीचा लाभ घेण्यास हयगय केली तर कधींही हित होणार नाहीं. हें समजून ह्या गोष्टींविषयीं शेतकऱ्यांनीं फार जपावें.

७. शेतकरी लोक सावकारांस दिलेल्या वसुलाच्या किंवा जमिनीबद्दल भरलेल्या धान्याच्या पावत्या घेतील त्या, व आणखी जपून ठेवण्यासारखे कागद असतील ते, चांगल्या दप्तरांत बांधून ठेवण्यास जपतील तर फार हित होईल. ‘ एक लिखा आणि हजार बका ’ ह्या म्हणी-

प्रमाणें तोंडच्या बोलण्यापेक्षां लेखांचें महात्म फारच मोठें आहे. म्हणून प्रसंगोपात जे कागद जपून ठेवण्यासारखे असतील ते हयगयीनें गैर विल्हेत टाकूं नये. नीट रुमालांत बांधून ठेवावे, आणि चार चार महिन्यांनीं दप्तर सोडून त्याची झाडाझाड करून पुनः तसेच बांधून नीट रक्षण करावे. या गोष्टीस अगदीं चुकूं नये.

## सर्व लोकांस विनंती.

मित्रहो, आपल्या शेतकऱ्यांची स्थिति कशी आहे हें ह्या पुस्तकावरून बरेंच ध्यानांत आलें असेल. ह्या देशांतल्या पंचवीस कोट प्रजेपैकीं सोळा कोटीपेक्षांही ज्यास्त लोक फार दैन्य दशा भोगीत आहेत, आणि ती कमी करण्याबद्दल कोणी कांहींच तजवीज न करितां आपण सर्वच लोक चित्रासारखे थिजून गेलों आहों. शेतकरी लोक फार अडाणी व अतिशय दरिद्री तर खरेच, परंतु त्यांचा आपणाशीं जो संबंध आहे तो फार श्रेष्ठ दिसतो. शेतकरी हे आपणा सर्वांचे अन्नदाते होत. ते श्रम करून धान्य पिकवितात तें आपण खातों म्हणून आपला प्राण वांचला आहे. ‘ अन्नमय प्राण ’ ह्या वाक्याचा नीट विचार केला तर आमचा जीव जगविणारे शेतकरी हे अन्नदाते होत. मातापितरें आपणास जन्म देतात, पण शेतकरी लोक अन्न घालून प्राणांचें रक्षण करितात, हे त्यांचे आपणावर किती उपकार आहेत ! आपल्या शरीरांतील सर्व ‘ रक्तमांस ’ शेतकऱ्यांच्या अन्नाचें आहे असें म्हटलें तर काय चिंता आहे ? आपणावर ज्यांचे असे

महत उपकार झाले आहेत व होत आहेत त्यांच्याशीं आपण कृतज्ञतेनें किती वागतों ? अति सहवासामुळें आपण प्रत्यक्ष मातेची देखील अमर्यादा करतों. त्याप्रमाणें ह्या गरीब शेतकऱ्यांजवळ बेफिकिरीनें व कृतघ्नतेनें आपण वागत आहों असें म्हटलें तर काय दोष येईल ? आज पिढ्यान-पिढ्या आपण त्यांचें अन्न खात असतां दुर्दैवानें ते आज फार डबघाईस आले आहेत. अशा वेळीं ‘ खाल्लया घरचे वांसे मोजल्याप्रमाणें ’ आपण त्यांस कांहींच साह्य केलें नाहीं, किंवा त्यांच्या संकट निवारणार्थ उपाय केले नाहींत तर अशा कृतीस दुसरें काय म्हणवेल ? असो, होऊन गेल्याबद्दल आतां बोलून कांहीं फळ नाहीं, परंतु यापुढें तरी सर्वांनीं काळजी धरली पाहिजे.

आपल्या हातीं राज्यसत्ता नाहीं, सरकारांत वजन नाहीं, नवळ द्रव्य नाहीं, अशा अनेक नकारघंटा वाजत असतां आम्हीं शेतकऱ्यांचें हित कोणत्या उपायानें करावें ? असें कोणी म्हणेल तर त्याजवर असें उत्तर आहे कीं, शेतकऱ्यांची खरी स्थिति उजेडांत आणणें, त्यांना ती नीट समजून देणें, व ह्या पुस्तकांत सुचविल्याप्रमाणें एखाद्या पाटलास किंवा त्याच्या मुलास शिक्षण देऊन शहाणा करणें ही गोष्ट फार अवघड नाहीं, किंवा निदान ह्या पुस्तकाची एखादी प्रत घेऊन ती खेडेगांवांतील वाचणाऱ्या शेतकऱ्याच्या मुलास बक्षीस देणें, येवढी गोष्ट जरी प्रत्येक वाचणारानें केली तरी मोठी कामगिरी बजावली जाणार आहे. ज्यांच्या कष्टाचें अन्न आपण नित्य खात आहों, व त्यापासून झालेल्या रक्ताचें अभिसरण आपल्या शरीरांत प्रतिक्षणीं होत असल्यामुळेंच आपण जिवंत राहून

सर्व व्यवसाय करीत आहों; अशा प्रकारें शेतकरी लोकांचे आपणावर झालेले व होणारे उपकार स्मरून आपले मनांत त्याजविषयीं कृतज्ञता बुद्धी जागृत ठेवणें हें प्रत्येक मनुष्याचें कर्तव्य आहे. तें न विसरतां आपल्या शक्तीनुसार होईल तेवढा प्रयत्न निश्चयानें सतत चालू ठेवल्यास परमेश्वर कृपेनें आमचे शेतकरी लवकरच शहाणे व संपन्न होतील हा भरंवसा आहे, म्हणून सर्वांनीं ही गोष्ट विसरूं नये.

# पुस्तकें मिळण्याचीं ठिकाणें.

**पुणें**–ज्ञानप्रकाश छापखाना.

,, रा॰ रा॰ नारोअप्पाजी गडबोले दु॰ पेठ बुधवार.

**मुंबई**–नेटिव्ह ओपिनियन छापखाना.

,, वे॰ शा॰ रा॰ रा॰ महादेव शास्त्री अमरापुरकर, मार्केटांत खारेकुव्यासमोर.

**कोल्हापूर**–रा॰ रा॰ गंगाधर पांडुरंग गद्रे अ॰ मास्तर हायस्कूल.

**सातारा**–रा॰ रा॰ कृष्णाजी केशव साठे अ॰ मा॰ हायस्कूल.

**नाशिक**–रा॰ रा॰ नरहर पुरुषोत्तम टिळक अ॰ मास्तर हायस्कूल.

**रत्नागिरी**– ,, ,, नारायण विनायक साठे बी. ए. हेडमास्तर हायस्कूल.

**पंढरपूर**-रा॰ रा॰ आनंदराव विनायक सोहनी हेडमास्तर इंग्लिश स्कूल.

**बार्शी**-रा॰ रा॰ गोविंद तात्या दि॰ हेडमास्तर इंग्लिशस्कूल.

**बेळगांव**–रा॰ रा॰ रावजी बाळाजी करंदीकर डे॰ इन्स्पेक्टर बेळगांव.

**मिरज**-रा॰ रा॰ विठलराव हरी लिमये न्यायाधीश संस्थान मिरज.

**संगमनेर**–रा॰ रा॰ विसाजी भास्कर भावे डि॰ पोस्टमास्तर संगमनेर.

**सोलापूर**-रा॰ रा॰ लक्ष्मण शिवराम कोलटकर बी ए. अ॰ मास्तर हायस्कूल.

**ठाणें**-रा॰ रा॰ जनार्दन बाळाजी मोडक बी. ए. हेड मास्तर हायस्कूल.

**बडोदें**– रा॰ रा॰ रामकृष्ण जनार्दन कीर्तने.

**नवसरी**-रा॰ रा॰ नागेशराव विनायक बापट

**अहमदनगर**–रा॰ रा॰ शंकर रामचंद्र हातवळणे अ॰ मास्तर हायस्कूल.